दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३२४ I सोमवार ७ सप्टेंबर २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## गणेशोत्सवात दंगली घडवल्या जातील : राज ठाकरे



**ठाणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा राज्यस्तरीय पदाधिकारी मेळावा आज, ६ सप्टेंबर रोजी ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृहात झाला. यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गणेशोत्सवाच्या काळात देशात दंगली घडवण्याचा डाव असल्याचा खळबळजनक दावा केला.गणेशोत्सवात दंगली घडवल्या जातील, अशी मला सर्वाधिक भीती आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात दंगली घडवल्या जातील, असे ठाकरे म्हणाले. देशातील मूळ प्रश्नांपासून नागरिकांचे लक्ष विचलित करण्यासाठी हा प्रकार घडवला जाऊ शकतो, असा दावा त्यांनी केला.मुंबईत घडलेल्या काही घटनांकडेही त्यांनी लक्ष वेधले. सुजाण हिंदू आणि सुजाण मुस्लिमांनी सतर्क राहावे. आपल्या किंवा त्यांच्या नावाने कुणीतरी या घटनांमध्ये घुसवले जाऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला.

## महत्त्वाचे..

### श्रींच्या आगमनाला पाऊस बरसणार!

मुंबई : श्रावण महिना आता संपत आला असला तरी श्रावणसरी बरसलेल्या दिसल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच शेतीसाठी देखील अपेक्षित पाऊस न पडल्याने शेतकरीदेखील चिंतेत आहेत. असं असताना हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी नवी आशा देणारा अंदाज वर्तवला आहे. त्यांच्या अंदाजानुसार राज्यात गणेशोत्सवाच्या सुरुवातीला मुसळधार पाऊस पडणार आहे.राज्यात १३ ते १७ सप्टेंबर या काळात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. आतापर्यंत बीड जिल्ह्यातील ज्या भागांमध्ये पाऊस पडला नव्हता, तसेच धाराशिव, लातूर, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये अपेक्षित पाऊस पडला नव्हता. पण आता या भागांमध्ये चांगल्या पावसाची शक्यता आहे. विदर्भातील जिल्ह्यांमध्ये ६ आणि ७ सप्टेंबरच्या दरम्यान पावसाची शक्यता आहे. हा पाऊस पिकांना जीवनदान देणारा पाऊस ठरणार आहे. विदर्भातील ११ जिल्ह्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे, असं पंजाबराव डख म्हणाले आहेत.

# १५ हजार ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण बदलणार?

## इच्छुकांचे राजकीय गणित पुन्हा बदलण्याची शक्यता

### सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आरक्षण प्रक्रियेला धक्का

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यातील मुदत संपलेल्या तसेच २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे १५ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची तयारी सुरू असतानाच सरपंचपदाच्या आरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया ग्राम विकास विभागाकडून सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे या प्रक्रियेचा फेरविचार करण्याची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील इच्छुक उमेदवारांच्या राजकीय गणिताला मोठा धक्का बसण्याची चिन्हे आहेत.




ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्याचे काम सध्या विविध जिल्ह्यांत सुरू आहे. काही ठिकाणी ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत आरक्षण निश्चित करण्याचे नियोजन असल्याची माहिती आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणाचा फेरविचार करावा लागतो का, याबाबत प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी राजकीय आरक्षणाची तरतूद आहे. आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक नसावी, तसेच ओबीसी आरक्षण निश्चित करताना सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांचे पालन करणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर सरपंचपदाच्या आरक्षणाची सध्याची प्रक्रिया न्यायालयीन आदेशांशी सुसंगत आहे का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

विधिमंडळाने आरक्षणासंदर्भातील कायद्यात केलेल्या दुरुस्तीचे पालन झाले आहे का, याचाही मुद्दा न्यायालयीन प्रक्रियेत पुढे आला आहे. त्यामुळे ग्रामविकास विभागाला आरक्षणाची प्रक्रिया ज्या पद्धतीने राबविण्यात आली आहे, त्याचा पुन्हा आढावा घ्यावा लागू शकतो.

गावागावांत सरपंचपदासाठी इच्छुकांनी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. अनेकांनी मतदारांशी संपर्क वाढविला असून, पॅनेलची बांधणी आणि संभाव्य उमेदवारांची चाचपणीही सुरू केली आहे. काही ठिकाणी आरक्षणाच्या शक्यतेनुसार उमेदवार निश्चित करण्याचे राजकीय गणित आखण्यात आले आहे.

अशा परिस्थितीत सरपंचपदाचे आरक्षण बदलल्यास अनेक इच्छुकांच्या राजकीय समीकरणांवर पाणी फिरण्याची शक्यता आहे. एखाद्या गावातील आरक्षण सर्वसाधारण, महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा ओबीसी प्रवर्गासाठी बदलल्यास उमेदवारीच्या संपूर्ण गणितालाच नव्याने सुरुवात करावी लागू शकते.

त्यामुळे आरक्षणाची प्रक्रिया पुन्हा राबवावी लागणार का, सध्या निश्चित केलेले आरक्षण कायम राहणार का आणि त्याचा ग्रामपंचायत निवडणुकीच्या वेळापत्रकावर परिणाम होणार का, याकडे ग्रामीण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

विशेषतः राजकीयदृष्ट्या संवेदनशील ग्रामपंचायतींमध्ये आरक्षण बदलाची शक्यता निर्माण झाल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. आता शासन आणि ग्रामविकास विभागाकडून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने नेमकी कोणती कार्यवाही केली जाते, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

**१९ जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची प्रक्रिया विविध टप्प्यांवर**

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, परभणी, बीड, गडचिरोली, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नंदुरबार, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये सरपंचपदाच्या आरक्षणाची प्रक्रिया विविध टप्प्यांवर पूर्ण झाली आहे. मात्र, आरक्षणाची अंमलबजावणी केवळ जिल्हानिहाय करण्याऐवजी जिल्हा युनिटनुसार आरक्षण निश्चित करण्याच्या पद्धतीबाबतही सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर नव्याने विचार करण्याची शक्यता आहे. त्यामुळे या जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींच्या आरक्षणाबाबत पुढील निर्णयाकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

**आरक्षण बदलले तर...**

- विद्यमान इच्छुक उमेदवारांची उमेदवारी अडचणीत येऊ शकते.
- पॅनेलची रचना पुन्हा करावी लागू शकते.
- महिला आरक्षणामुळे अनेक गावांतील समीकरणे बदलू शकतात.
- ओबीसी, अनुसूचित जाती–जमातीच्या आरक्षणावरही परिणाम होण्याची शक्यता.
- निवडणूक तयारीचा खर्च आणि राजकीय मोर्चेबांधणीवर परिणाम होऊ शकतो.
- निवडणुकीच्या वेळापत्रकाबाबतही नव्याने स्पष्टता आवश्यक ठरू शकते.

## अतिक्रमणे न हटविल्यास ठोकशाही पद्धतीने मोर्चा काढू : आ. संग्राम जगताप

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** गणपती, नवरात्र उत्सवाचा विचार करून प्रशासनाने नेवासा शहराच्या मुख्य चौकातील अतिक्रमण तात्काळ हटवावीत अन्यथा पुढचा मोर्चा लोकशाही ऐवजी ठोकशाही पद्धतीने काढला जाईल. असा सज्जड इशारा आ. संग्राम जगताप यांनी दिला. नेवासा येथे रविवारी आयोजित हिंदू जन आक्रोश मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मोर्चाला प्रचंड गर्दी झाली होती.

नेवासा शहरातील फळ गाड्यांच्या अतिक्रमणाच्या विरोधात निवेदन दिल्याने भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे यांच्या गाडीवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ रविवारी दुपारी नगरपंचायत चौकात सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला त्यावेळी आ. संग्राम जगताप बोलत होते.

आ. गोपीचंद पडळकर, आ. विठ्ठलराव लंघे, हभप संग्राम बापू भंडारे झालेल्या सभेच्या व्यासपीठावर उपस्थित होते

यावेळी बोलतांना आमदार जगताप म्हणाले संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य (पान ४ वर)



## अंतरवालीतच ओबीसी आंदोलकांचा ठिय्या; २ सप्टेंबरचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**जालना :** मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर अंतरवाली सराटी येथे आता ओबीसी समाजातील आंदोलकांनीही उपोषण सुरू केले आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यास विरोध करत २ सप्टेंबरचा शासन निर्णय रद्द करावा, शिंदे समिती व जातपडताळणी समितीच्या कामकाजाला आळा घालावा, तसेच आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या ओबीसी आंदोलकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व सरकारी नोकरी द्यावी, अशा विविध मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत.

ॲड. मंगेश ससाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू केले आहे. 'ओबीसींच्या ताटातील आरक्षण काढून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे,' असा आरोप करत आंदोलकांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. मराठा समाजाला स्वतंत्र ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसींच्या जागांवर मराठा समाजातील उमेदवारांनी निवडणुका लढवल्याचा आरोप आंदोलकांनी केला. तसेच कुणबी प्रमाणपत्राच्या माध्यमातून ओबीसी प्रवर्गात प्रवेश होत असल्याचा दावा करत, 'ओबीसीमध्ये घुसखोरी होत नाही का?' असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

'अंतरवाली सराटी आता उपोषणाची पंढरी झाली आहे. सगळे येथे येत असल्याने आम्हीही येथेच उपोषण सुरू केले आहे,' असे आंदोलकांनी सांगितले. सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू देऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.दरम्यान, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून राधाकृष्ण विखे पाटील, प्रसाद लाड आणि उदय सामंत हे प्रशासनावर दबाव आणत असल्याचा आरोप ॲड. मंगेश ससाणे यांनी केला. तसेच जातपडताळणीच्या मुद्द्यावर प्रसाद लाड यांनी कोणत्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली, याचा खुलासा करावा, अशी मागणी ओबीसी आंदोलक विठ्ठल तळेकर यांनी केली. त्यामुळे जरांगे यांच्या आंदोलनासोबतच अंतरवाली सराटीत ओबीसी समाजाचे आंदोलनही आता आक्रमक होत असल्याचे चित्र आहे.

## एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आक्रोश मोर्चापूर्वी पाचपुते मैदानात!

### पुण्यात विद्यार्थ्यांशी थेट संवाद; 'प्रश्न सोडवा, राजकारण नको'

### मोर्चाला सरकारचा विरोध नाही; चौकशी समितीत विद्यार्थी प्रतिनिधींच्या समावेशाचाही विचार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** एमपीएससी विद्यार्थ्यांनी पुण्यात आयोजित केलेल्या आक्रोश मोर्चाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच आमदार विक्रम पाचपुते यांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या मागण्या, आक्षेप आणि भूमिका समजून घेत सरकार चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे पाचपुते यांनी स्पष्ट केले.

उद्या पुण्यात एमपीएससी विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज संबंधित शिक्षकांशी चर्चा केली. त्यानंतर आमदार विक्रम पाचपुते यांनी पुण्यात विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या आणि मागण्यांवर सविस्तर चर्चा केली.मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेत विविध मागण्या मांडण्यात आल्या असून, त्यावर सकारात्मक वातावरणात चर्चा झाल्याचे पाचपुते यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचा मोर्चा संविधानिक आणि शांततापूर्ण मार्गाने होत असेल, तर सरकारचा त्याला कोणताही विरोध नाही. मोर्चाला परवानगी देण्यात आली असून तो रद्द करण्याची सरकारची भूमिका नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

एमपीएससी विद्यार्थ्यांचे प्रश्न हे गंभीर असून त्यावर संवादातून तोडगा काढण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे सांगताना पाचपुते यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा राजकीय हेतूसाठी वापर करू नये, अशी स्पष्ट भूमिका घेतली.विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर राजकारण करण्यापेक्षा ते सोडवणे महत्त्वाचे आहे, असे पाचपुते यांनी ठामपणे सांगितले.

**प्रश्न विचारा, पण राजकारण कशासाठी?**

आ. रोहित पवार यांनी या विषयावर प्रश्न उपस्थित करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे पाचपुते यांनी सांगितले. मात्र विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तात्काळ राजकीय भूमिका घेऊन त्याचा वापर करणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**एमपीएससीअध्यक्षांच्या राजीनाम्यावर स्पष्ट भूमिका**

एमपीएससी आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीवर बोलताना पाचपुते यांनी कायदेशीर आणि घटनात्मक बाब स्पष्ट केली. एमपीएससी हा स्वायत्त आयोग असून अध्यक्षांची नियुक्ती राज्यपालांकडून केली जाते. त्यामुळे सरकारला थेट अध्यक्षांचा राजीनामा मागण्याचा अथवा घेण्याचा अधिकार नाही, असे त्यांनी सांगितले.

या प्रकरणातील चौकशीत कोणी दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाई केली जाईल. मात्र नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देणे हा संबंधित व्यक्तीचा वैयक्तिक (पान ४ वर)

## वीर गोगादेव जन्मोत्सव मिरवणुकीत 'बत्ती गुल'!

### नेता सुभाष चौकात गोंधळ घालणाऱ्यांना पोलिसांचा चोप ..

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त अहिल्यानगर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक चितळे रोड रोडवरील नेता सुभाष चौकात रस्त्यावर येतात ' बत्ती गुल ' झाली. या अंधाराचा फायदा घेत काही जणांनी या मिरवणुकीत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. परंतु घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी येऊन गोंधळ घालणाऱ्यांना चांगलाच चोप दिला. या घटनेमुळे काही काळ नेता सुभाष चौकात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

रविवारी अहिल्यानगर शहरामध्ये वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीच्या पार्श्वभूमिवर आज सकाळपासूनच शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये स्टेज टाकण्यावरून आरोप प्रत्यारोप सुरू होते. सायंकाळी ही मिरवणूक चितळे रोडवरील नेता सुभाष चौकात येतात, बत्ती गुल झाली. या घटनेचा नागरिकांनी महापालिका प्रशासनाचा यावेळी निषेध केला. दरम्यान काही वेळातच एका टोळक्याने मिरवणुकीत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आणि गोंधळ घालणाऱ्या तरुणांना चांगला ' प्रसाद ' दिला. या घटनेमुळे काही काळ नेता सुभाष चौकात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त चितळे रोड रस्त्याने येणाऱ्या मिरवणुकीचे स्वागत करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने स्टेज उभारण्यात आला होता. दरम्यान याच चौकात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनीही शिवसेना पक्षाच्यावतीने उभारण्यात आलेल्या स्टेजच्या समोरच्या बाजूला स्वतंत्र स्टेज उभारला. यावेळी शिवसेना व राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली होती. यावेळी पोलिसांनी घटनास्थळी येऊन दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना शांततेचे आवाहन केले. तसेच यावेळी नेता सुभाष चौकात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

**विक्रम राठोड आक्रमक**

नेता सुभाष चौकात आमने सामने स्टेज उभारल्याने शिवसेना नेते विक्रम राठोड चांगलेच आक्रमक झाले होते. विरोधक नेहमीच काहीतरी कुरबुरी काढण्याच्या उद्देशाने खोडसाळपणा करतात. नेता सुभाष चौक हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. केवळ बदनामी करण्यासाठी हा खटाटोप विरोधकांकडून केला जातो. असे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

## एमपीएससीच्या पीएसआय परीक्षेत 'मास कॉपी'?

### १५० उमेदवारांवर आ. रोहित पवार यांना संशय

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या मुद्द्यावरून राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असंतोष वाढत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार पक्षाचे कर्जत–जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी विभागांतर्गत पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेबाबत गंभीर आरोप केला आहे. या परीक्षेत ६१५ पैकी जवळपास १५० उमेदवारांनी 'मास कॉपी' करून परीक्षा उत्तीर्ण केल्याची माहिती मिळाल्याचा दावा त्यांनी केला असून, यासंदर्भातील काही पुरावे आपल्याकडे आल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

रोहित पवार यांनी 'एक्स'वर केलेल्या पोस्टमध्ये या कथित गैरप्रकारात अन्न व औषध प्रशासन विभागाच्या औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटी प्रकरणात अटकेत असलेला अभिजीत लेंडवे आणि त्याच दर्जाचा अन्य एक अधिकारी सहभागी असल्याचे पुरावे मिळाल्याचा दावा केला आहे. या प्रकरणाचा (पान ४ वर)

# जीडीपी वाढीच्या आकड्याखालील उपाशी अर्थव्यवस्था!

**७.८ टक्के विकासदर उत्साह देणारा; मात्र अर्थव्यवस्थेच्या तळाशी असलेले वास्तव तपासल्याशिवाय विकासाचे चित्र पूर्ण होत नाही!**

--------------

भारतीय अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ७.८ टक्के विकासदर नोंदवला. जगातील अनेक अर्थव्यवस्था अनिश्चिततेच्या सावटाखाली असताना भारताने साधलेली ही वाढ निश्चितच स्वागतार्ह आहे. पश्चिम आशियातील संघर्ष, कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबतची चिंता, जागतिक व्यापारातील बदल आणि हवामानातील अनिश्चितता अशा अनेक अडचणी असतानाही भारतीय अर्थव्यवस्था वाढत आहे, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. मात्र, अर्थव्यवस्थेचे आरोग्य केवळ जीडीपीच्या आकड्याने ठरत नाही. आकडा वाढतोय; पण त्या वाढीची उब सामान्य माणसाच्या घरापर्यंत पोहोचतेय का? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. मुंबईतील मोठ्या उद्योगांची उलाढाल, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राची वाढ, वाहनविक्री किंवा मोठ्या कंपन्यांचा नफा यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा सरासरी आकडा वर जाऊ शकतो. पण महाराष्ट्रातील एखाद्या दुष्काळग्रस्त गावात शेतकऱ्याच्या घरातील खर्चाचे गणित बदलले आहे का? त्याच्या शेतमालाला उत्पादन खर्चापेक्षा समाधानकारक भाव मिळतोय का? मुलाच्या शिक्षणाचा, घराच्या बांधकामाचा किंवा शेतीच्या निविष्ठांचा खर्च भागवताना त्याच्यावर कर्जाचा डोंगर वाढतोय की कमी होतोय? या प्रश्नांची उत्तरेही विकासाचे मोजमाप करताना महत्त्वाची ठरली पाहिजेत. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ग्रामीण भाग आहे. गावातील शेतकरी, शेतमजूर, छोटे दुकानदार, कारागीर, वाहनचालक, बांधकाम मजूर आणि लघुउद्योजक यांच्या हातात पैसा फिरला तरच ग्रामीण बाजारपेठेला चालना मिळते. गावातील किराणा दुकानापासून कृषी सेवा केंद्रापर्यंत आणि मोटारसायकलच्या दुकानापासून कपड्यांच्या बाजारापर्यंत त्याचा परिणाम दिसतो. शेतमालाचे उत्पादन झाले तरी भावाची खात्री नाही. कांदा, सोयाबीन, कापूस, तूर, मका, ऊस, दूध अशा विविध पिकांच्या बाबतीत उत्पादन खर्च सातत्याने वाढतो आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी, डिझेल, वीज, सिंचन आणि वाहतूक यांचा खर्च वाढत असताना बाजारभाव मात्र अनेकदा शेतकऱ्याच्या अपेक्षेप्रमाणे मिळत नाही. त्यामुळे उत्पादन वाढले म्हणजे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले, असे सरसकट म्हणता येत नाही. शेतकऱ्याच्या घरात पैसा आला तर तो सर्वप्रथम कर्ज फेडतो, शेतीची थकबाकी भागवतो, मुलांच्या शिक्षणाचा खर्च करतो आणि घरातील गरजा पूर्ण करतो. त्यानंतरच बाजारात खरेदी करण्याची क्षमता उरते. त्यामुळे ग्रामीण मागणी वाढवायची असेल तर केवळ उत्पादन नव्हे, तर शेतकऱ्याच्या हातात प्रत्यक्ष उत्पन्न वाढले पाहिजे. सेवा क्षेत्राची कामगिरी चांगली असली तरी कृषी क्षेत्राची स्थिती समाधानकारक नसेल तर ग्रामीण भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होणारच. हवामानातील बदल, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळी परिस्थिती आणि अवकाळी पाऊस या सगळ्यांनी शेतीचे गणित अधिकच कठीण केले आहे. पाऊस योग्य वेळी झाला तर बाजारभावाचा प्रश्न; पाऊस कमी झाला तर उत्पादनाचा प्रश्न आणि पाऊस अतिवृष्टीच्या रूपाने आला तर पिकांच्या नुकसानीचा प्रश्न शेतकऱ्यापुढे संकटांचे पर्याय संपत नाहीत. शेतीला पाणी, बाजाराला स्थैर्य आणि शेतकऱ्याला भाव मिळाला तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते. अन्यथा शहरांमधील विकासाचा वेग आणि गावातील आर्थिक वास्तव यांच्यातील दरी वाढतच राहील. विकासदराचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे रोजगार. मोठ्या उद्योगांची गुंतवणूक वाढली, सेवा क्षेत्राचा विस्तार झाला किंवा उत्पादन वाढले तरी त्यातून पुरेशा प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली नाही, तर विकासाचा फायदा मर्यादित वर्गापुरता राहण्याची शक्यता असते. ग्रामीण भागात तर हा प्रश्न अधिक गंभीर आहे. शेतीतील कामाचा कालावधी मर्यादित असल्याने अनेक शेतमजूर वर्षातील काही महिने रोजगाराच्या शोधात शहरांकडे वळतात. बांधकाम, वाहतूक, हॉटेल व्यवसाय, छोटे कारखाने आणि इतर असंघटित क्षेत्रांवर त्यांची उपजीविका अवलंबून असते.गावातील तरुणांच्या हाताला वर्षभर काम मिळत नसेल, तर विकासदराचा मोठा आकडा त्यांच्यासाठी किती अर्थपूर्ण आहे, हा प्रश्न विचारावाच लागेल स्वस्त धान्य, खतांवरील अनुदान, विविध सामाजिक योजना आणि ग्रामीण भागासाठीच्या सरकारी कार्यक्रमांमुळे कोट्यवधी कुटुंबांना आधार मिळतो. हा सामाजिक आधार आवश्यक आहे. मात्र, वाढत्या अनुदानाचा सरकारी तिजोरीवर होणारा परिणामही लक्षात घ्यावा लागेल.

महागाई नियंत्रण, सरकारी खर्च, व्याजदर आणि विकासासाठीची गुंतवणूक यांचा समतोल साधणे सरकार आणि रिझर्व्ह बँकेसमोरचे मोठे आव्हान आहे. व्याजदर वाढले तर उद्योग आणि घरबांधणीवर परिणाम होऊ शकतो; दर कमी ठेवले तर महागाईचे आव्हान निर्माण होऊ शकते. म्हणून विकासाचा वेग टिकवतानाच आर्थिक शिस्त राखणे गरजेचे आहे देशातील काही मोठ्या कंपन्यांचे उत्पन्न वाढले, शेअर बाजारात तेजी आली किंवा उच्च उत्पन्न गटाची खरेदी वाढली म्हणून संपूर्ण देशाची क्रयशक्ती वाढली असे मानणे योग्य ठरणार नाही. गावातील बाजारपेठ हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. शेतकऱ्याच्या हातात पैसा असेल तर सायकलपासून मोटारसायकलपर्यंत, खत-बियाण्यांपासून घरगुती वस्तूंपर्यंत खरेदी वाढते. दुकानदाराची उलाढाल वाढते. त्यातून व्यापाऱ्याला उत्पन्न मिळते आणि पुन्हा तो पैसा गावात फिरतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील पैसा फिरणे हेच विकासाचे खरे चक्र आहे.

हे चक्र कमकुवत असेल तर कागदावरील विकासदर मोठा असूनही सामान्य नागरिकाला आर्थिक सुबत्ता जाणवणार नाही. अर्थव्यवस्था खरोखरच मजबूत होत असेल तर खासगी गुंतवणुकीत त्याचे प्रतिबिंब दिसले पाहिजे. उद्योगपतींनी नवीन प्रकल्प उभारले, रोजगारनिर्मिती केली आणि देशांतर्गत मागणीवर विश्वास दाखवला, तर विकासाला अधिक मजबूत आधार मिळेल. सरकारने उद्योगांना सुविधा देणे, पायाभूत सुविधा सुधारणे आणि धोरणात्मक स्थैर्य निर्माण करणे आवश्यक आहे. मात्र, उद्योगांची गुंतवणूक आणि सामान्य नागरिकाची क्रयशक्ती या दोन्हींची सांगड घातल्याशिवाय विकास व्यापक होणार नाही.

७.८ टक्के विकासदराचे स्वागत करायलाच हवे. प्रतिकूल जागतिक परिस्थितीत भारताची अर्थव्यवस्था टिकून आहे, ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. पण त्याच वेळी या वाढीचा फायदा कोणाला आणि किती मिळतो, याची तपासणीही आवश्यक आहे. शेतकऱ्याला उत्पादनाला योग्य भाव मिळतोय का? शेतमजुराला वर्षभर रोजगार मिळतोय का? ग्रामीण तरुणाला गावाजवळ काम मिळतेय का? लघुउद्योजकाचा व्यवसाय वाढतोय का? गावातील बाजारपेठेत ग्राहकांची खरेदी वाढतेय का?सामान्य कुटुंबाच्या हातात बचतीसाठी पैसा उरतोय का? या प्रश्नांची उत्तरे 'होय' असतील, तरच विकासदराचा आकडा खऱ्या अर्थाने जनतेच्या जीवनात उतरला असे म्हणता येईल. कारण जीडीपी वाढणे ही अर्थव्यवस्थेची उपलब्धी आहे; पण नागरिकाचे जीवनमान सुधारणे ही विकासाची खरी कसोटी आहे.

आज भारत वेगाने पुढे जात असल्याचे आकडे सांगत आहेत. त्या वेगाचा लाभ शहरांपासून गावापर्यंत, उद्योगपतींपासून शेतकऱ्यापर्यंत आणि उच्च उत्पन्न गटापासून सामान्य ग्राहकापर्यंत पोहोचला, तरच ही वाढ सर्वसमावेशक ठरेल. ७.८ टक्के हा आकडा आशादायक आहे; आता त्या आशेचे रूपांतर शेतकऱ्याच्या उत्पन्नात, तरुणाच्या रोजगारात आणि सामान्य माणसाच्या वाढलेल्या क्रयशक्तीत होते का, याची खरी परीक्षा बाकी आहे. आकडा मोठा असणे चांगले; पण त्या आकड्याचा लाभ मोठ्या संख्येने लोकांना मिळणे त्याहून महत्त्वाचे. विकास 'दिसतो'य की खरोखर 'जाणवतो'य? याचे उत्तरच भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुढच्या अध्यायाची दिशा ठरवेल.

विशेष संपादकीय — करण नवले (संपादक)

# गुणोरे गावच्या लोकनियुक्त सरपंचावर अविश्वास ठराव : ११ सप्टेंबरला विशेष ग्रामसभेची नोटीस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** पारनेर तालुक्यातील गुणोरे- गाडीलगाव येथील ग्रुप ग्रामपंचायत सदस्यांनी लोकनियुक्त सरपंच श्री सुरेश धोंडिबा ढवळे यांच्यावर दि ४ सप्टेंबर रोजी नऊ सदस्यांनी एकत्र येत समक्ष तहसील कार्यालयात जाऊन अविश्वास ठराव दाखल करण्यासाठी तहसीलदारांकडे मागणी केली.

सदर सरपंच हे पदाचा गैरवापर करत असून मनमानी करत आहेत. कोणत्याही सदस्यांना विचारात अथवा विश्वासात घेत नाहीत त्यामुळे गावात अनेक कामा मध्ये मोठा आर्थिक भ्रष्टाचार झाला असल्याचा व कामे ही निकृष्ट दर्जाची झाली असल्याचा आरोपही गावातून होत असून या त्यांच्या हुकूमशाही मनमानी कारभारामुळे विद्यमान सरपंच श्री सुरेश ढवळे यांचे वरील सदस्यांचा विश्वास उडाला आहे. या नाराजी मुळे पुढील विकास कामेही ठप्प झाली आहेत.त्यामुळे यांना या पदावर राहण्याचा अधिकार नाही तरी हा अविश्वास ठराव संमत करावा अशी मागणी केली. होती

सदर अविश्वास ठरावावर किशोर रायचंद गोपाळे, दीपक शिवाजी सोनवणे, प्रकाश भास्कर बोचरे, आशा संपत गाडीलकर,छाया किशोर गोपाळे,हरिदास अण्णासाहेब बढे,मालन दशरथ गाडीलकर,वैशाली बाबाजी मेसे,सोनाली प्रवीण ढवळे, यांच्या अविश्वास ठराव मागणीवर सह्या आहेत.त्या अनुषंगाने पारनेर च्या तहसीलदार सौ. गायत्री सौदाणे यांनी यासंदर्भात सदस्यांच्या निवेदनाची तातडीने दखल घेत पुढील कार्यवाही साठी दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता गुणोरे ता पारनेर येथे ग्रुपग्रामपंचायत कार्यालय गुणोरे येथे विशेष सभा आयोजित केली असून त्या बाबत च्या प्रकारच्या नोटीसाही सर्वं सदस्य व सरपंच यांना देण्यात आल्या आहेत.

# वीर गोगाजी महाराज जन्मोत्सव व छडी उत्सव उत्साहात

## २१ दिवसांच्या कठीण व्रताची भव्य मिरवणुकीने सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महायोगी श्री गोरक्षनाथ यांचे परमशिष्य, लोकदैवत तसेच वाल्मीक समाजाचे कुलदैवत वीर गोगाजी महाराज (जाहरवीर) यांचा जन्मोत्सव व छडी उत्सव राहुरी येथे भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने २१ दिवसांच्या कठीण व्रताची भव्य मिरवणुकीने सांगता करण्यात आली. वीर गोगाजी महाराज हे सामाजिक व धार्मिक एकतेचे प्रतीक मानले जातात. राजस्थानमधील चौहान वंशातील राजे असलेल्या गोगाजी महाराजांना हिंदू बांधव 'गोगाजी महाराज', तर मुस्लिम बांधव 'गोगा पीर' किंवा 'जाहर पीर' म्हणून श्रद्धेने पूजतात. राजस्थानमधील गोगामेडी हे त्यांचे प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. जन्मोत्सवानिमित्त श्रावण महिन्यात वाल्मीक समाजातील भाविकांकडून २१ दिवसांची कठोर उपासना केली जाते. या काळात चप्पल न घालणे, गादी किंवा पलंगाचा वापर न करणे तसेच ब्रह्मचर्याचे पालन करण्याचे नियम भाविकांकडून पाळले जातात. गुरू गोरक्षनाथांनी गोगाजी महाराजांना दिलेली पवित्र 'छडी' हे उत्सवाचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. ५ सप्टेंबर रोजी राहुरीतील भगीरथी शाळेसमोरील श्री गोरक्षनाथ व गोगादेव मंदिरापासून मिरवणुकीस प्रारंभ झाला. शनी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शुक्लेश्वर चौक मार्गे मिरवणूक शांततेत पार पडली. यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. राहुरी परिषदेचे गटनेते हर्षदादा तनपुरे यांच्या उपस्थितीत भाविकांनी २१ दिवसांचे व्रत सोडले. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी सोनू भगत टीकायती, गुलशन बिवाल, पवन उमरवाल यांच्यासह वाल्मीक समाजातील नागरिक व तरुण मंडळांनी परिश्रम घेतले.



# ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदारांचा सत्कार व मेळावा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि., प्रवरा नगर व प्रवरा ऊसतोड व वाहतूक मजूर संस्था प्रा. लि., प्रवरानगर यांच्या संयुक्त विद्यमाने गळीत हंगाम सन २०२६-२७ निमित्त ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदारांचा सत्कार समारंभ व मेळावा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदारांचा सत्कार करण्यात आला. आगामी गळीत हंगाम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी ऊसतोडणी, वाहतूक व्यवस्था तसेच शेतकऱ्यांच्या ऊसाची वेळेत तोडणी व गाळप याबाबत आवश्यक नियोजनावर यावेळी चर्चा करण्यात आली.साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचे यश हे शेतकरी, कामगार, ऊसतोडणी कामगार आणि वाहतूक कंत्राटदार यांच्या समन्वयावर अवलंबून असते. त्यामुळे सर्व घटकांनी एकजुटीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करून गळीत हंगाम २०२६-२७ यशस्वी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.या प्रसंगी कारखान्याचे एमडी महेश कोन्हापुरे, तसेच सर्व संचालक मंडळ, ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदार तसेच संबंधित मान्यवर उपस्थित होते.



# पवित्र मरिया विश्वासाचे आदर्श उदाहरण : फा. संजय पारखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव :** पवित्र मरिया ही विश्वासाचे सर्वोत्तम उदाहरण असून, देवाची योजना पूर्णपणे समजत नसतानाही त्याच्यावर दृढ विश्वास ठेवला पाहिजे. संकटात धीर न सोडता देवाची इच्छा कृतीत आणणे, या तीन गोष्टी पवित्र मरियेकडून शिकण्यासारख्या आहेत, असे प्रतिपादन फा. संजय पारखे यांनी केले.

हरेगाव येथील संत तेरेजा चर्च मतमाउली भक्तिस्थान येथे ६ सप्टेंबर रोजी चतुर्थ यात्रापूर्व नोव्हेनाच्या चतुर्थ पुष्पप्रसंगी ते बोलत होते. 'विश्वासाची आदर्श पवित्र मरिया' या विषयावर त्यांनी प्रवचन केले.

फा. पारखे म्हणाले, विश्वास म्हणजे केवळ देव आहे असे मानणे नव्हे, तर त्याची योजना समजत नसतानाही त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवणे होय. देवदूत गॅब्रियलने तारणहाराची माता होणार असल्याचे सांगितल्यानंतर पवित्र मरियाने 'मी प्रभूची दासी आहे, आपल्या वचनाप्रमाणे होवो,' असे म्हणत देवाच्या इच्छेवर विश्वास ठेवला. बेथलेहेममधील गरिबी, इजिप्तला पलायन आणि क्रुसावरील येशूचे दुःख पाहतानाही तिने विश्वास सोडला नाही. खरा विश्वास सुखात नव्हे, तर संकटात तपासला जातो, असे त्यांनी सांगितले.




आजच्या काळात भौतिकवाद, पैशावरील अतिविश्वास आणि तंत्रज्ञानाचा अतिरेक यामुळे आध्यात्मिक जीवनाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे दररोज प्रार्थना करणे, देवाचे वचन वाचणे, संस्कारांमध्ये सहभागी होणे आणि विश्वासू व्यक्तींची संगत ठेवणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी हरेगावचे प्रमुख धर्मगुरू फा. डॉमनिक रोझारिओ, फा. फ्रान्सिस ओहोळ, फा. संतान रॉड्रिग्ज यांच्यासह धर्मगुरू, धर्मभगिनी व भाविक उपस्थित होते. ७ सप्टेंबर रोजी 'पवित्र मरिया प्रभावी मध्यस्थीनी' या विषयावर फा. गिलबर्ट दिनीस यांचे प्रवचन होणार आहे.

# 'स्वत:च्या प्रयत्नातून निधी आणा, मगच महायुतीच्या कामाचे श्रेय घ्या'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** शहराच्या सुरक्षेसाठी मंजूर झालेला सुमारे ९९ लाख रुपयांचा निधी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजन समितीतून उपलब्ध झाला असून, आमदार अमोल खताळ यांनी त्यासाठी पाठपुरावा केला होता. महायुती सरकारच्या निधीचे श्रेय घेण्यापेक्षा विरोधकांनी स्वतःच्या प्रयत्नातून निधी आणून दाखवावा, असा टोला शिवसेना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी लगावला आहे.

महिलांची सुरक्षितता, वाढत्या चोरीच्या घटनांना आळा तसेच शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रमुख चौक व अतिसंवेदनशील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी आमदार अमोल खताळ यांनी पालकमंत्री विखे पाटील यांच्याकडे केली होती. त्याची दखल घेत जिल्हा नियोजन समितीतून सुमारे ९९ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

या निधीतून अकोले नाका, त्रिमूर्ती चौक, जनता नगर कॉर्नर, बसस्थानक कॉर्नर, चावडी चौक, तीन बत्ती चौक, चंद्रशेखर चौक तसेच नगरपालिका कोर्ट इमारत परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात आली आहे.

सीसीटीव्हीमुळे सार्वजनिक ठिकाणांवरील हालचाली पोलिसांच्या निगराणीखाली आणण्यास मदत होणार असून, चोरीच्या घटना रोखणे, संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि गुन्ह्यांच्या तपासातही या यंत्रणेचा उपयोग होणार आहे. महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून शहर व तालुक्यात विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध होत आहे. मात्र, मागील सहा महिन्यांत स्वतः च्या निधीतून एकही ठोस विकासकाम दाखवता न आल्याने महायुतीच्या निधीचे श्रेय घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप महायुती पदाधिकाऱ्यांनी पत्रकाद्वारे केला आहे.

# ॲड. अजित काळे यांच्या हस्ते गोविंद सागरचे पूजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** टाकळीभान टेल टँक (गोविंद सागर) चे पूजन काल ५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड अजित काळे यांनी शेतकऱ्यांसमवेत केले. यावेळी ॲड काळे बोलताना म्हणाले की शेतकऱ्यांसाठी पाणी व वीज हे प्रश्न महत्त्वाचे असून टाकळीभान टेल टँकमुळे येथील शेतकऱ्यांचा पिण्याच्या पाण्याचा व शेतीचा प्रश्न मार्गी लागला असून, अशी जलसंधारणाची मोठी कामे उभारणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. हरेगाव येथील बीसी नाला याचा विस्तार करून तो टेल टँक सारखा व्हावा यासाठी शासनाकडे प्रयत्न



करणार असून त्यामुळे ही अनेक शेतकऱ्याची शेती फुलली जाईल.यावेळी गोविंद सागर तलावाचे जल पूजन शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजित काळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी टाकळीभान ग्रामस्थ व शेतकरी बांधवांच्या वतीने ॲड काळे व पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे लक्ष्मणराव वडले, शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हरी अप्पा तुवर, शेतकरी संघटनेचे प्रभारी व प्रवक्ते कार्लस साठे, किसान सभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, जिल्हा संघटक भास्कर तुवर युवा अध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी , बेलपिंपळगावचे माजी उपसरपंच बंडोपंत चौगुले, शेतकरी युवा नेते सचिन वेताळ, बाबासाहेब वेताळ, सुजित, बोडखे, भाजप उद्योग आघाडीचे अनिल बोडखे. साहेबराव चोरमल ,सतीश नाईक, मच्छिंद्र पटारे. दत्तात्रय मगर,ॲड धनराज कोकणे ,शिवाजी पटारे , शिवाजीराजे पटारे , अशोक काळे सुजित पटारे, रेवनाथ भणगे ,पत्रकार बांधव आदी सह शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी व शेतकरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुळा प्रवरा वीज संस्थेचे अवसायक खेडकर यांना घेरावो आंदोलन

## बाह्य स्रोत अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती ; पात्रता नसतानाही कार्यकारी संचालक नियुक्ती




शफीक बागवान| राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** हाताला काम नसतानाही मुळा प्रवरा वीज संस्थेत अवसायक रावसाहेब खेडकर यांनी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याच्या विरोधात घेराओ आंदोलन करण्याचा इशारा संस्थेच्या काही माजी सभासद तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांनी दिला आहे. यामुळे संस्थेविरोधात वाद पुन्हा एकदा उफाळणार असल्याचे संकेत आहेत.

राहुरी येथील निबंधक रावसाहेब खेडकर हे दोन-तीन वर्षांपासून वीज संस्थेचे अवसायक म्हणून काम पाहत आहेत. दबाव आणि कोणाच्या तरी सांगण्यावरून खेडकर यांनी या बाह्यश्रोत कर्मचाऱ्यांची संस्थेत नेमणूक केली आहे. गेल्या पंधरा वर्षापासून संस्थेचा न्यायालयीन लढा आजही सुरूच आहे. बाह्यश्रोत एक-दोन कर्मचाऱ्यांनी हातचे राखून हा लढा सुरू राहील, अशा प्रकारची व्यूव्हरचना या संस्थेत करून ठेवली आहे. या बाबीची संस्थेच्या मागील संचालक मंडळातील काही संचालकांना पूर्ण कल्पना आहे.

या एक दोन बाह्य स्रोत कर्मचाऱ्यांनी अवसायकांना विश्वासात न घेताच पात्रता नसलेल्या कर्मचाऱ्याची कार्यकारी संचालक पदी नेमणूक केली आहे. संस्थेच्या इतिहासात झाले नसतील एवढे अलीकडच्या तीन वर्षात या ठिकाणी कार्यकारी संचालक नेमले गेले. या बाबीची सहकार क्षेत्रात मोठी चर्चा रंगली आहे. अवसायक रावसाहेब खेडकर यांनी दबावाखाली या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याने संस्थेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सभासदांनी या विषयी नाराजी व्यक्त केली आहे.

न्यायालयीन कामकाजासाठी नेमलेल्या या दोन चार कर्मचाऱ्यांवरून संस्थेत यापूर्वी अनेकदा वाद झाले आहेत. या कर्मचाऱ्यांवर मागील संचालक मंडळातील काही संचालकांना संशय आल्याने संस्थेचे जेष्ठ तत्कालीन संचालक पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि माजी चेअरमन डॉ.सुजय विखे यांनी या कर्मचाऱ्यांची हकालपट्टी केली होती. बनवाबनवी करत हे चार-पाच कर्मचारी पुन्हा तिसऱ्यांदा संस्थेत हजर झाले आहेत. हे कर्मचारी हजर होताच संस्थेत गेल्या ४० वर्षापासून न्यायालयीन कामकाज पाहणारे आणि हिशोब विभागातील कर्मचाऱ्यांनी वाद नको म्हणून संस्थेतून बाहेर पडणे पसंत केले. उशिरा येऊन लवकर घरी जाणे, संस्थेत न येणे, संस्थेत काम न करता मोबदला घेणे, बाह्य कामे उरकून मग संस्थेत येऊन टवाळक्या करणे अशा या बाह्यश्रोत कर्मचाऱ्यांविषयी अवसायकांकडे तक्रारी आहेत.

संस्थेला वीज वितरणाचा परवाना मिळवून देण्याचे हास्यास्पद आश्वासन या कर्मचाऱ्यांनी अवसायक खेडकर यांच्यासह तत्कालीन संचालक मंडळातील काही संचालकांना दिले आहेत. स्वतःला प्रमुख समजणारे हेम दोन चार बाह्यश्रोत ठराविक कर्मचारीच संस्थेतील कोट्यावधी रुपयांची देवाण घेवाण करत आहेत. खेडकर यांच्यासह इतरांना त्याची काही कल्पनाही नसते. या कर्मचाऱ्यांविषयी आक्षेप घेणारी यंत्रणा नसल्याने त्यांचे फावले आहे. संस्थेतील अनागोंदी आणि आर्थिक उधळपट्टीला अवसायक खेडकर यांनी लगाम न घातल्यास त्यांना कोणत्याही क्षणी घेराव घालण्यात येईल, असा इशारा संस्थेचे माजी अभियंता प्रकाश बिदे, मनसुख चोरडिया, संजय थोरात, नित्यानंद लोंढे, सुरेश करपे, अशोक तुवर, राजू सय्यद, माणिक वाकचौरे, भाऊसाहेब निपुंगे, रामराव वाघ, गोरख गुळवे, विजय बोर्डे, बाळासाहेब दवंगे, अमृत बोडखे, बंडू कोकणे, राजू कनगरे, काकासाहेब सगटगिळे, विष्णू मोढे यांच्यासह शेकडो माजी कर्मचारी आणि सभासदांनी दिला आहे .

**३ वर्षात ३ कार्यकारी संचालक**

अलीकडच्या काही वर्षात स्वतःला प्रमुख समजणाऱ्या कर्मचाऱ्यांनी मनात येईल त्यांना कार्यकारी संचालक पद देण्याची मालिका सुरू केली आहे. प्रारंभी जे जी करपे यांची नेमणूक करण्यात आली होती मात्र संस्थेने त्यांना मोबदला न दिल्याने त्यांनी संस्थेला सोडचिठ्ठी दिली. त्यानंतर विजय पाटील यांची नेमणूक करण्यात आली. तेही मध्येच सोडून गेले. सध्या सोपान गोरे या पदावर नियुक्त आहेत. पात्रता नसतानाही या पदावर काही खुषमस्क-यांनी गोरे यांची नियुक्ती केली आहे. संस्थेतील काही कर्मचारी या निवडणुकीबाबत नाराज आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द·ख·ल



## मळगंगा युवा साईधामची दहीहंडी पाहण्यासाठी गर्दी

**निघोज :** डी जे चा दणदणाट,डी जे च्या तालावर नाचणारी तरुणाई व जय श्री कृष्ण जयघोषाने निघोज येथील मळगंगा युवा साईधाम मंडळाने दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला. यावेळी तब्बल २१ हजार रुपयांची बक्षिसे मंडळाच्या वतीने ठेवण्यात आली होती मात्र पाच थर दहीहंडी कुणालाच फोडता न आल्याने शेवटी तीन थरावर दहीहंडी आणण्यात आली.तुळजाई मित्र मंडळाने दहीहंडी फोडली व पाच हजार रुपयांचे बक्षीस जिंकले. राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या प्रांगणात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. श्री मळगंगा युवा साईधाम मंडळाने जोरदार तयारी केली होती. यावेळी मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्या जय श्रीकृष्ण देवाच्या जयघोषाने परिसर निनादून गेला होता. निघोज गावात फक्त याच मंडळाने दहीहंडी उत्सव साजरा केला. यावेळी मंदिर प्रांगणात मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला भगीनी उपस्थित होत्या. तुळजाई मित्र मंडळाने दहीहंडी फोडल्यानंतर परिसरात जल्लोष करण्यात आला.

## विद्यार्थी हा त्याच्या गुणधर्माने ओळखला जातो : प्रा. डॉ. नेहुल



**कोरडगाव :** विद्यार्थी हा त्याच्या गुणामुळे म्हणजेच अंगी असलेल्या गुणधर्मामुळे ओळखला जातो. हुशार विद्यार्थी कधीही वाईट वर्तन करत नाही. अभ्यासामुळे त्याच्या जीवनाला शिस्त लागते. विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारून जगाकडे सकारात्मक आणि वैज्ञानिक नजरेने पाहण्याची वृत्ती जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. जनार्दन नेहुल यांनी केले. यावेळी वध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब किलबिले, संचालक नारायण काकाडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मधुकर देशमुख, अशोक कांजवणे, संस्थेचे सचिव भास्कर गोरे, निरीक्षक भाऊसाहेब आठरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष देशमुख, डॉ. दादा मरकड आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. नेहुल म्हणाले की, विद्यार्थ्याची ओळख त्याच्या गुणवत्तेवरून होत असते. त्यावेळी गरीब-श्रीमंत, उच्च-नीच किंवा जातिभेदाला महत्त्व नसते. आजच्या स्पर्धात्मक आणि जागतिकीकरणाच्या युगात गुणवत्तेला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे अनेक देशांनी शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर मोठी प्रगती केली आहे. भारताच्या विकासाच्या वाटचालीत शिक्षणव्यवस्थेतील काही अडथळे आणि परिस्थितीशी तडजोड करण्याची मानसिकता दूर करण्याची गरज आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळ वाया न घालवता महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या शैक्षणिक व इतर सुविधांचा पूर्ण उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## मिशन आपुलकीतून पळसपुर शाळेला साऊंड सिस्टिमसाठी १५ हजारांची देणगी

**निघोज :** पळसपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी 'मिशन आपुलकी' अंतर्गत गावचे माजी सरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य माधव भागाजी पवार यांनी शाळेला साऊंड सिस्टिम खरेदीसाठी १५ हजार रुपयांची देणगी दिली. शाळेच्या विकासासाठी लोकसहभागातून मिळणारे योगदान विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसोबतच शाळा व ग्रामस्थांमधील आपुलकीचे नाते अधिक दृढ करणारे ठरत आहे. माधव पवार यांनी दिलेल्या या योगदानाबद्दल शाळेच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतीश आहेर, श्रीकांत वाघमारे, बाबू आहेर, माजी चेअरमन रामदास ढोले यांच्यासह ग्रामस्थ व शाळेतील शिक्षक उपस्थित होते. शाळेच्या विकासासाठी दिलेल्या या मौलिक योगदानाबद्दल माधव भागाजी पवार यांचे ग्रामस्थ व विविध स्तरांतून अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

## पिंपळगाव रोठा येथील श्री खंडेश्वर विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात



**निघोज :** पिंपळगाव रोठा येथील श्री खंडेश्वर विद्यालयात शनिवार (दि. ५) शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षक सुनील टोपले सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक दिनाचे नियोजन केले. भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले यावेळी स्वर्गीय माजी आमदार वसंतराव झावरे पाटील यांच्याही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक कोंडीबा मधे होते. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. पाटोळे सर, घुले सर व पानसरे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक दिनाचे मुख्याध्यापक म्हणून सर्वानुमते कु. वैष्णवी शिकारे हिची निवड करण्यात आली. कु. दिपाली केदार, कु. आदिती शिकारे, आदित्य शिकारे व पवन बोराटे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अश्विनी शिकारे हिने केले, तर आभार कु. वैष्णवी शिकारे हिने मानले. शिक्षक दिनाच्या निमित्ताने विद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# न्यायालयाच्या आदेशानुसारच डीजेचा आवाज ठेवावा

## अन्यथा कारवाई करण्याचा पाथर्डी पोलिसांचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** ध्वनिक्षेपक (स्पीकर) वापरावर आता सर्वत्र निर्बंध येत आहेत.न्यायालयाच्या आदेशानुसार व शासनाच्या नियमानुसारच ठराविक डेसिबल मध्ये ध्वनीक्षेपकाचा आवाज असावा,अन्यथा सार्वजनिक मंडळ असो अथवा खाजगी कार्यक्रम सर्वांवर एकसमान कडक कारवाई करण्यात येईल.असा इशारा पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी दिला.

आगामी गणेशोत्सव, नवरात्रोत्सवासह विविध कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुका डीजे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस स्टेशन येथे श्री.कोकरे यांची भेट घेतली.यावेळी ते बोलत होते.असोसिएशनचे अध्यक्ष नयूम शेख,राजेंद्र दगडखैर,अक्षय देहडराय,आवेज शेख,मिलिंद काळे,निखिल काकडे,ब्रह्मा शिरसाट,संकेत बोरुडे,गोपनीय विभागाचे नागेश वाघ आदी उपस्थित होते.

यावेळी असोसिएशनचे पदाधिकारी म्हणाले की,आम्ही न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दोन बेस व दोन टॉप लाऊन डीजेचा आवाज मर्यादित ठेवू.कुणालाही त्रास होणार नाही, याची काळजी घेऊ.बाहेरील तालुक्यातील व जिल्ह्यातील डीजे मालक या ठिकाणी येऊन गोंधळ घालतात. अशा डीजे चालकांवर कडक कारवाई करण्याची मागणी देखील त्यांनी केली.आम्ही कर्ज काढून व्यवसाय सुरू केला आहे.तरी आम्हाला प्रशासनाने सहकार्य करावे अशी मागणी सर्वच पदाधिकाऱ्यांनी केली. यावेळी श्री.कोकरे म्हणाले की,सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करावे,अन्यथा कायदा मोडणाऱ्या कारवाईला सामोरे जावे लागेल. कायदा मोडणाऱ्यावर दुजाभाव न करता एकसमान कारवाई करण्यात येईल.न्यायालयाचे आदेश,जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शक सूचनांचे सर्वांनी पालन करून आगामी सण - उत्सव आनंदाने साजरे करावेत. अन्यथा ध्वनिक्षेपक चालकांची सर्व यंत्रणा जप्त करून गुन्हे दाखल करण्यात येतील.विशेष म्हणजे रात्री १० नंतर कोणीही ध्वनिक्षेपक वाजवणार नाही याची काळजी घ्यावी.

## रेणावीकर विद्यालयात शिक्षक दिन साजरा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** सावेडी उपनगरातील रेणावीकर विद्यालयात शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षिका सौ. अश्विनी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक दिन उत्साहपूर्ण व आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. साईराज शिंदे यांनी प्रास्ताविकातून शिक्षक दिनाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. ईश्वरी म्हस्के यांनी अतिथींचा परिचय तर सार्थक हजारे यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. अभिरूप मुख्याध्यापिका अनन्या तुंगार हिने शिक्षकांच्या कार्याचे वर्णन केले. दीप्ती कुरमुडे यांनी शिक्षक मनोगत व्यक्त केले. कु. आर्या मनवेलीकर हिने नाट्यछटा सादर केली, तर इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी मनमोहक नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. अशोका आर्ट फाउंडेशन व 'श्री कला प्रतिष्ठान'चे संस्थापक-अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासोबत कला जोपासण्याचे, आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्याचे व स्वावलंबी होण्याचे मार्गदर्शन केले. प्रशालेची माजी विद्यार्थिनी ऋचा कुलकर्णी हिने प्रवासाचे महत्त्व व जीवनातील अनुभवांविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी साकारलेले अभिरूप शिक्षक, त्यांचे अध्यापन व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव हे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले.

## शेवगावात मंगळवारी रंगणार दहीहंडी उत्सव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अमरापुर :** श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त शेवगाव शहरात 'नगराध्यक्ष भव्य दहीहंडी उत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार (ता. ८) रोजी सायंकाळी सहा वाजता खंडोबा मैदान येथे हा उत्सव होणार आहे. उत्सवाच्या निमित्ताने शहरात भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दहीहंडी फोडणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकाला १ लाख ११ हजार १११ रुपये रोख व आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहे. तसेच उत्तेजनार्थ पाच गोविंदा पथकांना प्रत्येकी ११ हजार रुपयांचे रोख बक्षीस दिले जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विविध गोविंदा पथकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या कार्यक्रमास राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, खा. संदीपान भुमरे, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, आ. विठ्ठलराव लंघे, आ. अमोल खताळ, बाबू टायरवाले, अनिल शिंदे यांच्यासह विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणून लावणी सम्राट व रील स्टार स्नेहा पिंपरीकर यांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. तसेच ९ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'धप्पा' या चित्रपटाचे दिग्दर्शक, कलाकार, सहाय्यक कलाकार व चित्रपटाची संपूर्ण टीमही कार्यक्रमास उपस्थित राहणार आहे.

या उत्सवाचे आयोजन दहीहंडी उत्सव समिती, शेवगाव शहर, वंदे मातरम् ग्रुप तसेच शिवसेना नेते अरुणभाऊ मुंढे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

## जवळा परिसरात कृषीपंपांच्या केबल चोरीचा धडाका

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** पारनेर तालुक्यातील जवळा परिसरात माळवाडी, गव्हाळी, पठारेवस्ती, सालके वस्ती शिरूर जवळा रस्ता शिवारातील कृषी पंपांच्या तांब्यांच्या महागड्या केबल्स चोरीचा धडाका गेल्या दोन दिवसापासून भुरट्या चोरट्यांनी उठवला आहे त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. दीपक दादा भाऊ सालके सौरभ राजेंद्र लोखंडे नवनाथ शंकर रासकर लहू किसनराव रासकर संपत सालके ,तानाजी सालके आदी शेतकऱ्यांच्या रस्त्याकडे ज्या विहिरीवरील कृषी पंपांच्या तांब्याचे केबल अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी तरुण नेत लांबविल्या परिसरातून सोमवारी १५ ते २० शेतकऱ्यांच्या तांब्या च्या केबल्स त्यांनी दोन दिवसात चोरून नेल्या आहेत परंतु शेतकरी पोलिसात तक्रार देत नाहीत याचा फायदा जो त्यांना होत असून ते आणखी चोरीचा धडाका वाढवत आहेत तर शेतकरी ही नुसती झंझट नको म्हणून तक्रार देत नाहीत आणि दिली तरी चोरांचा तपास लागत नाही त्यामुळे चोरट्यांचेही चांगलेच फावत आहे तरी पोलिसांनी रात्रीच्या वेळी परिसरात गस्त वाढविणे गरजेचे असून संबंधित रात्री अशा चोरट्यांना ज्रेबंद करण्याची गरज असल्याचे परिसरातून बोलले जात आहे. सध्या ऑक्टोबर हीट सदृश्य परिस्थिती असून उन्हाचा तडाखा दुपारच्या वेळी वाढत आहे त्यामुळे पिकांना पाण्याची वरचेवर गरज लागत असून कृषी पंप चालू करण्यासाठी शेतकऱ्यांना विहिरीवर जावे लागते परंतु तांब्याच्या तारा चोरी जात असल्याने किती वेळा केबल विकत आणायच्या आणि त्या मोटारीला बसवायच्या असाही प्रश्न आता शेतकऱ्यांना पडला आहे. परंतु यावर कुणीही काही बोलत नसल्याने चोरटे मात्र जोमात आहेत.

> पोलीसांकडे चोरीची फिर्याद दिली तर पोलीस फिर्यादींना मानसिक त्रास देतात अशी परिस्थिती आहे. निघोज,जवळा या परिसरात विद्युत मोटारी,केबल चोरी असे प्रकार सातत्याने होत असतात मात्र पोलिसांना चोर सापडत नाहीत. निघोज येथील जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरातील मळगंगा देवीच्या मंदरातील चोरीचा प्रकार होऊन पंधरा दिवस झाले मात्र अद्यापही चोर सापडले नाहीत. अशा चोरीच्या घटना घडल्यानंतर पोलीस चोरट्यांपेक्षा फिर्यादींना जास्त त्रास देत आहेत. त्यापेक्षा फिर्याद न दिलेली बरी अशी प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे.

## डॉ. किशोर धनवटे यांना द पब्लिक एक्सलन्स अवॉर्ड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**ढोरजळगांव :** नेवासा शिक्षण ,साहित्य व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रा. डॉ. किशोर गजानन धनवटे यांना 'पब्लिक ब्रॉडकास्ट मीडिया' अहिल्यानगर यांच्यावतीने प्रतिष्ठित 'द पब्लिक एक्सलन्स अवॉर्ड' (ढहश झींलश्रळल एुलशश्रश्रशपलश -रीव) नुकताच अहिल्यानगर येथे माजी प्राचार्य डॉ.खा.ह. शितोळे व पब्लिक ब्रॉडकास्ट मीडिया' चे सिईओ कृष्णा बेलगावकर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला .

डॉ. किशोर धनवटे यांनी त्रिमुर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ढोरजळगाव येथे प्राचार्य म्हणून तसेच श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयातील भूगोल विभागाचे विभागप्रमुख म्हणून काम केले आहे.त्यांचा ३३ वर्षांचा प्रदीर्घ व समृद्ध अध्यापन अनुभव आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त पीएचडी मार्गदर्शक म्हणून त्यांनी काम पाहिले असून, ते सध्या 'शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य' शाखा नेवासाचे अध्यक्ष, 'मसाप' शाखा सोनईचे कार्याध्यक्ष, तसेच अहमदनगर जिल्हा मराठा पतसंस्था (शाखा नेवासा) च्या सल्लागार मंडळाचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय नेवासा येथे नव्याने सुरू झालेल्या 'सृजन कट्टा: शोध स्वतःचा' या खुल्या व्यासपीठाच्या समन्वय समितीचे ते सदस्य आहेत. विद्यापीठाचे उत्कृष्ट जिल्हा विद्यार्थी विकास अधिकारी (डऊज) म्हणून त्यांना यापूर्वी दोनदा (२०१६-१७ व २०१८-१९) सन्मानित करण्यात आले आहे. तसेच त्यांना आशिया युनिव्हर्सिटी बेंगलोरतर्फे 'डी. लिट. नॅशनल अवॉर्ड', भारतीय दलित साहित्य अकादमी दिल्लीचा 'महात्मा ज्योतिबा फुले फेलोशिप नॅशनल अवॉर्ड', आणि 'शिक्षक रत्न पुरस्कार' यांसारखे अनेक राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत संस्कारही जपावेत : हेमा शेलोत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत संस्कारही जोपासावेत भारतीय योगविद्या,सकस आहार,व्यायाम याबाबींकडेही कटाक्षाने लक्ष द्यावे असे आवाहन आरोग्यवर्धिनी योग निसर्गोपचार संस्थेच्या संस्थापक हेमा शेलोत यांनी केले. अहिल्यानगर येथील अ. ए. सोसाएटीच्या रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल या प्रशालेत सरस्वती पूजन सोहळ्यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाचीआवड, संस्कारांची जडणघडण व कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे प्राचार्य रविकिरण भांड होते. प्राचार्य रविकिरण भांड यावेळी म्हणाले की,विद्यार्थ्यांनी जीवनात सातत्य,सचोटी व आत्मनिर्भयता बाळगावी.आपले व्यक्तिमत्त्व अधिक कार्यक्षम बनवावे. शिक्षक व पालक यांच्याप्रती विद्यार्थ्यांनी आदर बाळगून जीवनाचे ध्येय निश्चित करावे. प्रतिमपूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी कहाणी वाचन करण्यात आले. कार्यक्रमास विद्यालयाचे उपप्राचार्य विष्णू गिरी,पर्यवेक्षक अरविंद आचार्य,मुख्याध्यापिका वनिता गोत्राळ, विद्या गांगर्डे, मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, निमंत्रक प्रतिभा वाईकर,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिशा देतात : प्राचार्य मोरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** जीवनातील शिक्षकांचे महत्त्व अनन्य साधारण असुन शिक्षक हे विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देत नाहीत, तर शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देऊन उज्ज्वल भविष्य घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात असे प्रतिपादन प्राचार्य दत्तात्रय मोरे यांनी बोलताना केले.

निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत दिवसभर अध्यापनाची जबाबदारी पार पाडली. यावेळी शिक्षक बाळू निळ यांनी शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या योगदानाबद्दल आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी-शिक्षिका राशी कुंदे हिने केले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या कार्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांची जबाबदारी, शिस्त, वेळेचे नियोजन आणि अध्यापनातील आव्हाने यांची जाणीव झाली. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना भेट म्हणून डायरी व पेन देण्यात आले.

# महिलांनी नोकरीपेक्षा उद्योग-व्यवसायाकडे वळावे : तांदळे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महिला व युवतींना विविध व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (नवी दिल्ली) संचलित जन शिक्षण संस्थेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील जन शिक्षण संस्थेत झालेल्या या कार्यक्रमात महिला प्रशिक्षिका व शिक्षिकांना विविध व्यावसायिक प्रशिक्षणाबरोबरच मार्केटिंग, बाजारपेठेची उपलब्धता, उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक असलेले बीज भांडवल, शासकीय योजना, कर्ज प्रक्रिया आणि उद्योजकता विकास याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षाणार्थी युवती व महिला देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जन शिक्षण संस्थेचे नूतन संचालक अनिल तांदळे, कार्यक्रम अधिकारी सय्यद शफाकत, मनीषा शिंपी, अनुष्का वारे, नीलिमा बल्लाळ, अमर अग्रवाल आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना कार्यक्रम अधिकारी सय्यद शफाकत यांनी जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रम व प्रकल्पांची माहिती दिली. देशाच्या प्रगतीच्या वाटचालीत शिक्षकांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले. गुरुशिवाय जीवनाला योग्य दिशा मिळू शकत नाही. गुरुंप्रती आदर, निष्ठा आणि कृतज्ञतेची भावना असणारे विद्यार्थी जीवनात यशस्वी होतात. शिक्षक केवळ ज्ञान देण्याचे काम करत नाहीत, तर समाज घडवून भावी पिढीला योग्य दिशा देण्याचे कार्य करतात, असे त्यांनी स्पष्ट केले.



जन शिक्षण संस्थेचे नूतन संचालक अनिल तांदळे यांनी महिला आज विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत असल्याचे सांगितले. चिकाटी, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर महिला उद्योग व व्यवसाय क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करीत आहेत. महिलांसाठी नोकरीपेक्षा उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या संधी निर्माण झाल्या असून, या संधींचा लाभ घेण्यासाठी महिलांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

युवक-युवतींमध्ये कौशल्याधारित शिक्षणाची रुजवणूक झाली तर सक्षम आणि आत्मनिर्भर भारताची निर्मिती होण्यास मोठी मदत होईल. केवळ पारंपरिक शिक्षणावर अवलंबून न राहता बाजारपेठेची गरज ओळखून कौशल्य आत्मसात करणे आणि त्या कौशल्याचे व्यवसायात रूपांतर करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे तांदळे यांनी स्पष्ट केले. जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत ४० हजारांपेक्षा अधिक महिला व युवतींना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम करण्यात आले आहे. कार्यक्रमात अमर अग्रवाल यांनी महिला बचत गट, विविध शासकीय योजना, कर्ज प्रक्रिया आणि उद्योजकता विकास या विषयांवर उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करताना कोणत्या बाबींचा विचार करावा, व्यवसायाची निवड कशी करावी, बाजारपेठेची गरज कशी ओळखावी, उपलब्ध साधनसामग्री व भांडवलाचा योग्य वापर कसा करावा, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. व्यवसाय सुरू करण्यासाठी केवळ आर्थिक भांडवल पुरेसे नसून योग्य नियोजन, बाजारपेठेचा अभ्यास, ग्राहकांची गरज, उत्पादनाची गुणवत्ता, प्रभावी मार्केटिंग आणि सातत्यपूर्ण प्रयत्न या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या असल्याचे अग्रवाल यांनी सांगितले.

# महापारेषणच्या चिंचवड अतिउच्चदाब वीज उपकेंद्रात आग

## पिंपरी चिंचवड परिसरातील वीजपुरवठ्यावर परिणाम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

महापारेषण कंपनीच्या चिंचवड येथील २२० केव्ही अतिउच्चदाब वीज उपकेंद्रात रविवारी (दि. ६) दुपारी सुमारे १२.२५ वाजता तांत्रिक बिघाड होऊन आग लागली. आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले असून, या बिघाडाचा परिणाम महावितरणच्या वीजपुरवठ्यावर झाला. महावितरणने उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करून बहुतांश प्रभावित भागाचा वीजपुरवठा दुपारी ३ वाजेपर्यंत पूर्ववत करण्यात यश मिळविले.



चिंचवड उपकेंद्रातील २२ केव्ही सीटी व ब्रेकरमध्ये स्फोट होऊन आग लागल्याने महावितरणला वीजपुरवठा करणाऱ्या उच्चदाब वाहिन्यांवर परिणाम झाला. परिणामी पिंपरी-चिंचवड शहरातील प्राधिकरण, रावेत, काळेवाडी, वाकड, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, सांगवी, पुनावळे, ताथवडे आदी भागांतील वीजपुरवठ्यावर परिणाम झाला. तसेच शिवाजीनगर, औंध व गणेशखिंड भागातील वीजपुरवठाही काही काळ खंडित झाला.महापारेषणकडून बिघाड झालेला भाग बंद ठेवून उर्वरित यंत्रणा पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तर दुसरीकडे, महावितरणकडून उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करून प्रभावित भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात आली. त्यामुळे बहुतांश भागातील वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात यश मिळाले. चिंचवड अतिउच्चदाब वीज उपकेंद्रातून निघणाऱ्या रहाटणी व गणेशखिंड १३२ केव्ही वाहिनीवर परिणाम झाल्याने शिवाजीनगर, औंध, गणेशखिंड, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर गावठाण, मॉडेल कॉलनी, बालगंधर्व आदी भागांतील वीजपुरवठाही काही काळ खंडित झाला होता. दुपारी १२.२५ वाजता खंडित झालेला या भागातील वीजपुरवठा सुमारे १.५० वाजता पूर्ववत करण्यात आला. गणेशखिंड अतिउच्चदाब वीज उपकेंद्रातून पुणे मेट्रोलाही वीजपुरवठा होतो. या वीजपुरवठ्यावरही काही काळ परिणाम झाला होता.महावितरणने पर्यायी मार्गाने वीजपुरवठा सुरळीत करण्यावर भर देऊन बहुतांश भागातील वीजपुरवठा दुपारी ३ वाजेपर्यंत पूर्ववत केला. मात्र निगडी, यमुनानगर, बिजलीनगर, रावेत, मामुर्डी, देहूरोड, चिंचवड, ताथवडे, वाकड आदी परिसरातील वीजपुरवठा सुरळीत होण्यास काहीसा विलंब होत आहे. या भागातील सुमारे सव्वालाख ग्राहकांना वीजपुरवठा पूर्ववत होण्यासाठी अधिक वेळ लागत आहे.महापारेषणच्या अतिउच्चदाब यंत्रणेतील बिघाडामुळे महावितरणच्या वितरण व्यवस्थेवर परिणाम झाला असला, तरी महावितरणने उपलब्ध पर्यायी व्यवस्थेचा प्रभावी वापर करून बहुतांश भागातील वीजपुरवठा पूर्ववत केला आहे. उर्वरित प्रभावित भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## दखल



**बुधवार पेठेतील सुवर्णयुग तरुण मंडळाची दहीहंडी कसबा पेठेतील राधेकृष्ण ग्रुपच्या गोविंदा पथकाने सात थर लावून फोडली.**

### राधेकृष्ण ग्रुपने फोडली सुवर्णयुग तरुण मंडळाची दहीहंडी

**पुणे :** बुधवार पेठेतील सुवर्णयुग तरुण मंडळाच्या दहीहंडी उत्सवात कसबा पेठेतील राधेकृष्ण ग्रुपच्या गोविंदा पथकाने सात थरांचा मनोरा रचत दहीहंडी फोडली. शनिवारी रात्री ९ वाजून २२ मिनिटांनी चौथ्या प्रयत्नात गोविंदांना यश मिळाले. गोविंदा विराज कांबळे याने हंडी फोडताच उपस्थितांनी जल्लोष केला.

बेलबाग चौकाजवळील जय गणेश प्रांगणात दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, सौरभ रायकर, सचिन आखाडे, अमोल चव्हाण, तुषार रायकर आणि प्रतिक घोडके यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.दहीहंडी पाहण्यासाठी गोपाळभक्तांची मोठी गर्दी झाली होती. भव्य एलईडी स्क्रीनवर श्रीकृष्ण लीला सादर करण्यात आली. दहीहंडी फोडणाऱ्या राधेकृष्ण ग्रुप पथकाला ५१ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उत्सवाच्या प्रारंभी नादब्रह्म ढोल ताशा ध्वज पथक ट्रस्टच्या वादकांनी पारंपरिक वाद्यवादन केले. पारंपरिक तसेच नव्या गाण्यांवर तरुणाईने ताल धरत गोपाळकाला आणि दहीहंडी उत्सव साजरा केला. पुण्यासह इतर शहरांमधूनही गोविंदा पथके सहभागी झाल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांनी दिली.

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'शिक्षक दिन' उत्साहात साजरा

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून अत्यंत आदरपूर्वक आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील ऐतिहासिक सरस्वती सभागृहात आयोजित सोहळ्यात विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.शिक्षक दिनाचे औचित्य साधून उपस्थितांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारांचा वारसा आणि शिक्षण व समाज घडवण्यात शिक्षकांचे असलेले अनन्यसाधारण योगदान यावर प्रकाश टाकला. आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगातही विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये आणि ज्ञानाची शिदोरी रुजवण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले.या सोहळ्यास उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. महेश उबाळे, विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ. धनंजय मंडलिक, डॉ. प्रभाकर देसाई, डॉ.सदानंद बनसोडे, डॉ. विजय खरे, डॉ. विलास आढाव, डॉ. वैभव जाधव आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.या प्रसंगी विद्यापीठातील विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. राधाकृष्णन यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

### रक्षाबंधनानिमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सैनिकांना बांधली राखी

**सोमेश्वरनगर :** रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त बारामती तालुक्यातील करंजे येथील प्रसिद्ध सोमेश्वर मंदिरात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी भेट देऊन देशसेवेत कार्यरत फौजी बांधवांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. देशाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र सेवा बजावणाऱ्या जवानांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. यावेळी पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, आजी-माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष ताराचंद शेंडकर, उपाध्यक्ष भगवान माळशिकारे, कायदेशीर सल्लागार गणेश आळंदीकर, सहसचिव विजय साबळे, खजिनदार राजेंद्र पवार, गणेश शेंडकर, लहुजी होळकर, किरण लकडे, राजाराम शेंडकर, मिनीनाथ होळकर, स्पोर्ट्‌स अकॅडमीचे अध्यक्ष भाऊसो लकडे आदी मान्यवर उपस्थित होते. श्रावण महिन्यानिमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोमेश्वर मंदिरातील स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेत पूजा-अर्चना केली. यावेळी मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होती. सैनिकांना राखी बांधून त्यांच्या देशसेवेला सलाम केल्याने मंदिर परिसरात भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### महाराष्ट्र पोलीस दलात अनिल भांड यांची निवड

**जारकरवाडी :** सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील अनिल ज्ञानेश्वर भांड यांनी महाराष्ट्र पोलीस दलात निवड होण्याचे यश संपादन केले.



अनिल भांड यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जारकरवाडी येथे झाले. शिक्षणासोबतच पोलीस भरतीचे ध्येय निश्चित करून त्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर तयारी केली. अनेक अडचणींचा सामना करत अखेर त्यांनी पोलीस दलात निवड होण्याचे स्वप्न साकार केले.त्यांच्या या यशामुळे जारकरवाडी परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. निवडीची माहिती मिळताच ग्रामस्थ, मित्रपरिवार, नातेवाईक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अनिल भांड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### सोमेश्वर पालखी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील करंजे येथील प्रसिद्ध सोमेश्वर मंदिरात श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी, ७ सप्टेंबर रोजी पारंपरिक पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी विविध जिल्ह्यांसह परराज्यातून मोठ्या संख्येने शिवभक्त येण्याची शक्यता असल्याने पोलीस प्रशासनाकडून सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी सोमेश्वर मंदिरात वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळ, सोमेश्वर पंचक्रोशीतील आजी-माजी पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## करंजे प्रवेशद्वाराला नवा आकर्षक साज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील करंजे गावाच्या प्रवेशद्वाराला आधुनिक व आकर्षक स्वरूप देण्यात आले असून, या प्रवेशद्वाराचे लोकार्पण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रवेशद्वारावर 'करंजे' नावासह 'मला करंजे आवडते' असा डिजिटल फलक उभारण्यात आला असून, आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

लोकनियुक्त सरपंच भाऊसो हुंबरे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारण्यात आला आहे. शेखर भगत यांनी त्यांचे चुलते अरविंद भगत व रामभाऊ भगत यांच्या स्मरणार्थ गावासाठी हा डिजिटल फलक उपलब्ध करून दिला आहे.




प्रवेशद्वारावर दिवंगत लोकनेते अजित पवार यांचे नाव व छायाचित्र लावण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा मिळाला असून, ग्रामस्थांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले आहे. आधुनिक डिजिटल तंत्रज्ञान, रंगीबेरंगी विद्युत रोषणाई आणि भव्य नामफलकामुळे करंजे गावाच्या प्रवेशद्वाराला वेगळी ओळख मिळाली आहे.

या लोकार्पणप्रसंगी ग्राम पंचायत सदस्य, आजी-माजी पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावाच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येत असून, नव्याने सजविण्यात आलेले प्रवेशद्वार नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

## साबळेवाडीत तुतीवरील रसशोषक किडींच्या व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** 'मेरा रेशम मेरा अभिमान' (एमआरएमए २.०) अभियानांतर्गत साबळेवाडी येथे तुतीवरील रसशोषक किडी तसेच रेशीम किड्यावरील उजी माशीच्या एकात्मिक व्यवस्थापनाबाबत प्रात्यक्षिक व जनजागृती गुरूवार (ता.३) कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी सुमारे ५० रेशीम उत्पादक शेतकरी सहभागी झाले.



**साबळेवाडी येथे तुतीवरील रसशोषक किडी व रेशीम किड्यावरील उजी माशीच्या व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सुनिल राठोड.**

केंद्रीय रेशीम मंडळाच्या संशोधन विस्तार केंद्र, बारामती येथील शास्त्रज्ञ डॉ. सुनिल राठोड यांनी तुतीवरील थ्रिप्स, माइट्स (कोळी) यांसारख्या रसशोषक किडींची ओळख, प्रादुर्भावाची कारणे आणि व्यवस्थापन पद्धतींबाबत मार्गदर्शन केले. किडींच्या नियंत्रणासाठी केंद्रीय रेशीम मंडळाच्या संस्थांनी शिफारस केलेलीच कीटकनाशके आणि व्यवस्थापन पद्धती वापरण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच प्रतिबंधात्मक व उपचारात्मक व्यवस्थापनात कडुनिंबावर आधारित जैविक उत्पादनांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

रेशीम किड्यांवरील उजी माशीची जीवशास्त्रीय माहिती, प्रादुर्भावाची कारणे, नुकसानाची लक्षणे आणि नियंत्रणाच्या उपाययोजनांची माहितीही देण्यात आली. उजी माशीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करण्यावर भर देण्यात आला. यामध्ये उजी ट्रॅप आणि नेसोलिन्क्स थायमस (एनटी) पाऊच या जैविक नियंत्रण पद्धतींचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय रेशीम मंडळाच्या संशोधन विस्तार केंद्र, बारामती यांच्या वतीने करण्यात आले. आयोजनासाठी प्रादेशिक रेशीम कार्यालय, पुणेचे सहाय्यक संचालक विठ्ठल फड आणि वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक श्याम मैडकर यांचे सहकार्य लाभले.

## भरती परीक्षा पद्धतीच्या सर्वंकष अभ्यासासाठी पुण्यात सल्लामसलत

### विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्था, परीक्षा यंत्रणा, विषयतज्ज्ञांना सहभागी होण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील भरती परीक्षा पद्धतीच्या विविध बाबींचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या माध्यमातून विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्था, परीक्षा यंत्रणा, विषयतज्ज्ञ तसेच संबंधित घटकांशी संवाद साधून त्यांच्या सूचना, मते व अनुभव जाणून घेण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने समितीची पुणे विभागीय सल्लामसलत १२ सप्टेंबर २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आली आहे. ही सल्लामसलत सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. या चर्चेत विद्यार्थी व स्पर्धा परीक्षा उमेदवार, शैक्षणिक संस्था, परीक्षा प्रक्रियेशी संबंधित यंत्रणा, विषयतज्ज्ञ आणि अन्य संबंधित घटक सहभागी होऊ शकतील.

भरती परीक्षा प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबतचे अनुभव, अपेक्षा आणि सुधारणा सूचना जाणून घेणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पुणे महसूल विभागातील सल्लामसलत प्रक्रियेच्या समन्वयासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे स्वतंत्र समन्वय कक्ष कार्यान्वित करण्यात येणार आहे. विद्यार्थी, उमेदवार, संस्था, तज्ज्ञ आणि अन्य संबंधित घटकांना आपल्या सूचना व अभिप्राय गुरुवार दिनांक ११ सप्टेंबर पर्यंत Pune-ExamReformsTaskforcemaharashtr.gov.in या ई-मेलवर पाठविता येतील.

प्राप्त सूचना व प्रत्यक्ष संवादासाठी आलेल्या विनंत्यांचा आढावा घेऊन सल्लामसलतीच्या नियोजनानुसार संबंधित व्यक्ती व संस्थांना शुक्रवार, १२ सप्टेंबर रोजी चर्चेची वेळ कळविण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिका व परीक्षा केंद्र व्यवस्थापन, परीक्षा प्रक्रियेची सुरक्षितता व विश्वासार्हता, तंत्रज्ञानाचा वापर, उमेदवारांशी संवाद, तक्रार निवारण, परीक्षा अनुभव तसेच भरती परीक्षा पद्धतीशी संबंधित इतर बाबींवरही सूचना व चर्चा करता येणार आहे, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## सासवडमध्ये उत्साहात दहीहंडी उत्सव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** विद्युत रोषणाईचा झगमगाट, ढोल-ताशांचा निनाद आणि 'गोविंदा आला रे'च्या गजरात सासवड शहरात दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कन्हय्या, हनुमान, कान्हा, संघर्ष, साकेत जगताप युवा प्रतिष्ठान आणि संघर्ष योद्धा या सहा मंडळांनी दहीहंडीचे आयोजन केले.



कन्हय्या मंडळाच्या ५५व्या वर्षानिमित्त आयोजित दहीहंडी गोखळी (ता. फलटण) येथील हनुमान दहीहंडी संघाने सात थर रचून फोडली. विजेत्या संघाला १ लाख ११ हजार रुपये व चषक देण्यात आला. मंडळाचे सौरभ जाळींद्रे व चेतन महाजन यांनी विविध स्पर्धांचे आयोजन केल्याचे सांगितले.

चांदणी चौकातील हनुमान मंडळाची ३३वी दहीहंडीही गोखळी येथील संघाने फोडली. यावेळी ५५ हजार ५५५ रुपये व चषकाचे बक्षीस देण्यात आले. नगरसेवक राजन जगताप यांनी उत्सवाची माहिती दिली.

जयप्रकाश चौकातील कान्हा मंडळाची दहीहंडी बारामतीच्या जयमल्हार संघाने फोडून १ लाख ११ हजार रुपयांचे बक्षीस मिळवले. श्रीकांत टिळेकर, अंकुर शिवरकर, मनीष रणपिसे, सागर भूमकर व आरिफ आत्तार यांनी नियोजन केले.नगरपालिका कार्यालयासमोरील साकेत जगताप युवा प्रतिष्ठानची पहिली दहीहंडीही गोखळीच्या संघाने फोडली. विजेत्यांना ८५ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. उत्सव प्रमुख साकेत जगताप व नगरसेविका प्रियांका साकेत जगताप यांनी महिलांसाठी पैठणी स्पर्धेचे आयोजन केले. मेन रोडवरील संघर्ष मंडळाची ११वी दहीहंडी जयमल्हार संघाने फोडून ७७ हजार ७७७ रुपयांचे बक्षीस पटकावले. अध्यक्ष गिरीश आंग्रे व डॉ. राजेश दळवी यांनी माहिती दिली. याच भागातील संघर्ष योद्धा मंडळाची दहीहंडीही जयमल्हार संघाने फोडत ५५ हजार रुपयांचे बक्षीस मिळवले.

## शेअर बाजाराच्या आमिषाने फसवणूक; नाळे बंधूंवर दोन गुन्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** शेअर मार्केट ट्रेडिंग व गुंतवणुकीच्या नावाखाली निश्चित परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून रक्कम स्वीकारल्याच्या आरोपावरून कार्तिक अरविंद नाळे व गौरव अरविंद नाळे (रा. डोर्लेवाडी, ता. बारामती) यांच्याविरुद्ध बारामती शहर पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले आहेत.

गु.र.नं. २४९/२०२६ मध्ये भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात BIG BULL INSTITUTE OF TRADING FINANCE या संस्थेचाही उल्लेख आहे.दरम्यान, रणजित बाळासो शिंदे यांच्या फिर्यादीवरून ३ सप्टेंबर रोजी गु.र.नं. ३६१/२०२६ दाखल करण्यात आला. कार्तिक व गौरव नाळे यांनी शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर निश्चित परताव्याचे आमिष दाखवून २२ लाख रुपये घेतल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. बँक खात्यांद्वारे झालेल्या व्यवहारांसह नोटरीकृत करारनाम्याचाही तपास सुरू आहे.

**बँक खाती व मनी ट्रेलची तपासणी**

पोलिसांकडून आरोपींची बँक खाती, डीमॅट व ट्रेडिंग अकाउंट, णझख व्यवहार, ब्रोकर स्टेटमेंट आणि इतर आर्थिक कागदपत्रांची तपासणी केली जात आहे. नागरिकांकडून घेतलेल्या रकमांचा प्रत्यक्ष शेअर बाजारात वापर झाला का, याचाही तपास केला जात आहे.दोन्ही आरोपी फरार असून त्यांच्या शोधासाठी पोलिसांची पथके कार्यरत आहेत.

## शेतकरीहितासाठी आधुनिक तंत्रज्ञान, मूल्यवर्धित उत्पादनांवर भर द्यावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादन खर्चात बचत आणि शेतीचे अर्थकारण मजबूत करण्यावर भर देणे आवश्यक आहे. बदलत्या हवामान परिस्थितीचा विचार करून कृषी व साखर क्षेत्राने आधुनिक तंत्रज्ञान, मूल्यवर्धित उत्पादन आणि अचूक नियोजनाचा स्वीकार करावा, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.




सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, सोमेश्वरनगर येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात त्या बोलत होत्या. यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, आमदार सचिन पाटील, माजी आमदार संभाजी कुंजिर, पीडीसीसी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, उपाध्यक्ष किसन तांबे, माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक राजवर्धन शिंदे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या की, शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक सिंचन पद्धती, यांत्रिकीकरण, माती परीक्षण, सुधारित वाण आणि अचूक पीक नियोजनाचा वापर वाढविल्यास उत्पादनक्षमता वाढवून खर्च कमी करता येईल.साखर उद्योगाने केवळ साखर उत्पादनावर अवलंबून न राहता इथेनॉल, बायोगॅस, सीएनजी, सेंद्रिय खत यांसह विविध मूल्यवर्धित उत्पादनांकडे वळण्याची गरज आहे. अतिवृष्टी, दुष्काळ, हवामानातील अनिश्चितता आणि बाजारातील चढ-उतारांचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने आर्थिक शिस्त, कार्यक्षम व्यवस्थापन आणि शेतकरीहिताला प्राधान्य देत सहकार क्षेत्रात विश्वास निर्माण केला आहे. सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कामगार आणि व्यवस्थापनाच्या योगदानामुळे कारखान्याने प्रगती साधली असून भविष्यातही शेतकरी सभासदांना अधिकाधिक लाभ मिळेल, यासाठी नियोजन करावे, असे पवार यांनी सांगितले.मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी कारखान्याच्या प्रगतीचे कौतुक केले.

आमदार सचिन पाटील यांनीही कारखान्याच्या कार्यक्षम व्यवस्थापनाचे आणि शेतकरीहिताच्या कामकाजाचे कौतुक केले. कारखाना अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी कारखान्याच्या विविध उपक्रमांची व कामगिरीची माहिती दिली. मेळाव्यास शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खड्ड्यांच्या वाटेवर जेऊर-कोल्हारचा प्रवास!

## दोन तालुक्यांच्या दळणवळणाला ब्रेक

## विद्यार्थी, भाविकांसह वाहनचालक त्रस्त ; रस्ता दुरुस्तीची मागणी

**शशिकांत पवार ।**
**राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका : छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील महावितरण कंपनी चौकातून जेऊरमार्गे कोल्हारकडे जाणाऱ्या रस्त्याची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. दोन तालुक्यांना जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावरून प्रवास करणे वाहनचालकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी लहान-मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना खड्डे चुकवत जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.**

जेऊर-कोल्हार रस्ता नगर व पाथर्डी तालुक्याला जोडणारा जवळचा मार्ग असल्याने या रस्त्यावर नियमित मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. पाथर्डी तालुक्यातील वृद्धेश्वर देवस्थान, श्रीक्षेत्र मढी, मायंबा, मोहटादेवी तसेच आगडगाव येथील काळभैरवनाथ देवस्थानांकडे जाणाऱ्या भाविकांचीही या मार्गावर मोठी वर्दळ असते. परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे भाविकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

बहिरवाडी, ससेवाडी, शिराळ चिचोंडी,वाघवाडी, कोल्हार आदी परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी जेऊर तसेच नगर येथे ये-जा करतात. दररोज शाळा-महाविद्यालयासाठी या रस्त्याचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांना खराब रस्त्यामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्याअभावी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

खड्ड्यांमुळे दुचाकी, चारचाकी तसेच इतर वाहनांचे नुकसान होत असून वाहनांच्या दुरुस्तीचा अतिरिक्त खर्च वाहनचालकांच्या माथी पडत आहे.

दोन तालुक्यांना जोडणारा हा महत्त्वाचा रस्ता केवळ वाहतुकीचा मार्ग नसून विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि भाविकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेला आहे. रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्याची मागणी शशिकांत इपरकर, भाऊसाहेब पाटोळे, बुवा पालवे, संभाजी डमाळे, नितीन मुळे, दिलीप गीते, गंगाधर घोरपडे, श्याम घोरपडे, आदिनाथ आव्हाड यांच्यासह बहिरवाडी, ससेवाडी, वाघवाडी, कोल्हार, शिराळ चिचोंडी आदी गावांतील नागरिकांकडून करण्यात येत आहे.



## द•ख•ल



### राशीनमध्ये आरोग्य विभागाची धडक मोहीम; जलद ताप सर्वेक्षणाला वेग

**राशीन :** शहरात संभाव्य साथीचे आजार रोखण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र राशीनच्या वतीने दैनंदिन जलद ताप सर्वेक्षण व कंटेनर सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. व्हरकटे डी. टी. यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य कर्मचाऱ्यांनी शहरातील विविध भागात प्रत्यक्ष पाहणी केली. या सर्वेक्षणादरम्यान नागरिकांच्या आरोग्याची माहिती घेत तापाचे रुग्ण शोधणे, घरांच्या परिसरातील पाणी साठवणाऱ्या कंटेनरची तपासणी करणे तसेच डासांची उत्पत्ती होऊ शकणारी ठिकाणे शोधणे यावर भर देण्यात आला. आरोग्य कर्मचाऱ्यांनी नागरिकांना घराभोवती पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी करण्यासाठी आरोग्य विभागाकडून दैनंदिन सर्वेक्षण सुरू असल्याचे सांगण्यात आले.

### सातव्यांदा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव




**राशीन :** शिक्षण क्षेत्रात सातत्यपूर्ण, गुणवत्तापूर्ण आणि उल्लेखनीय कार्याची ठोस पावती मिळवत हशू आडवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राशीनचे मुख्याध्यापक राजेंद्र नष्टे सर यांनी पुन्हा एकदा आपल्या कार्याचा ठसा राज्यस्तरावर उमटवला आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्तावाढ, सर्वांगीण विकास आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६' या राज्यस्तरीय पुरस्काराने सातव्यांदा गौरविण्यात आले. तसेच राशीन ग्रामपंचायतीचे कर्मचारी, राशीन मेडिकल असोसिएशन व डॉक्टर्स असोसिएशन, श्री जगदंबा विद्यालयातील सर्व कर्मचारी, पंचायत समिती कर्जतचे गटशिक्षणाधिकारी व कर्मचारी, विस्तार अधिकारी उज्वला गायकवाड, सुनील रेणुकर, शिरीष रेणुकर, विलास रेणुकर, विशाल रेणुकर, नवनाथ शिंदे, दीपक गुरव, विश्वास रेणुकर, योगेश भोज, संजय दीकेकर यांच्यासह कर्मचारी, व्यापारी संघटना, राजकीय संघटना तसेच कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी नष्टे सरांचे अभिनंदन केले.

### शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहावे : डॉ. कवडे




**निघोज :** लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील पद्मभूषण उपाधीने सन्मानित प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. प्रियंका दिवटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऋषिकेश गिते यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पोपट सुंबरे, यांनी केले. यावेळी प्रा. अर्जुन चाटे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. संजय जाधव, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. सुनीता जाधव, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. मच्छिंद्र बेलोटे, डॉ. शांता थोरात, प्रा. संदीप गेटम, प्रा. सचिन बलसाने, प्रा. अमोल नालकर, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. सुषमा करकंडे प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. राजाराम गोरडे, प्रा. सुनीता भालेराव, श्री. गोरख घोलप, श्रीमती सूर्यमाला भोर, श्री. नितीन घोलप, श्रीमती छाया म्हस्के, श्री. विकास सोनवणे, सागर शितोळे, मच्छिंद्र म्हस्कुले यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी प्रा. सचिन शिरसाट यांच्याकडे नेतृत्व



**पाथर्डी शहर :** तालुक्यातील क्रीडा क्षेत्राला अधिक संघटित व व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने पाथर्डी तालुका क्रीडा समितीच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असून, बाबूजी आव्हाड महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. सचिन शिरसाट यांची समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. क्रीडा क्षेत्रातील अनुभव, विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि क्रीडा उपक्रमांतील सक्रिय सहभाग यामुळे त्यांच्या निवडीकडे विशेषत्वाने पाहिले जात आहे. समितीच्या उपाध्यक्षपदी बाळासाहेब फलके, सचिवपदी राजेंद्र सोनवणे, सहसचिवपदी प्रवीण चोरमले, खजिनदारपदी बाळासाहेब बडे, कोशाध्यक्षपदी प्रा. रावसाहेब मोरकर यांची निवड झाली. प्रसिद्धीप्रमुखपदी श्रीकांत शहाणे, तर तंत्रस्नेही म्हणून किरण नरसाळे व विनोद ढाकणे यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी मंगेश उदमले, रवींद्र खेडकर आणि राजू सुरवसे यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, आमदार किशोर दराडे, प्राचार्य डॉ. बबन चौरे, अजय शिरसाट, रामदास दहिफळे, अविनाश घुगे, एकनाथ पालवे, माध्यमिक शिक्षक बँकेचे छबुराव फांदे सर आणि मुख्याध्यापक बाळासाहेब ढाकणे यांनी अभिनंदन केले. प्रा. सचिन शिरसाट यांच्या निवडीमुळे पाथर्डी तालुक्यातील क्रीडा क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात होण्याची अपेक्षा असून, ग्रामीण भागातील खेळाडूंच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी नूतन समिती प्रभावीपणे काम करेल, अशी भावना क्रीडाप्रेमी व शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

## महंत आदिनाथ महाराज शास्त्रींच्या उपस्थितीत हत्राळ-सैदापूरला मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**पाथर्डी शहर :** संतांचे विचार केवळ मंदिराच्या गाभाऱ्यात न राहता ते प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचले, तर गावाच्या प्रगतीला नवी दिशा मिळते. संत नारायण महाराजांच्या विचारांचा हाच संस्कार घराघरात रुजविण्याच्या उद्देशाने हत्राळ-सैदापूर येथे वाचासिद्धी संत नारायण महाराज यांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात व उत्साहात पार पडला. यावेळी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या उपस्थितीने सोहळ्याला विशेष आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले. संत नारायण महाराजांचे विचार आणि आचार घराघरात पोहोचविण्यासाठी आपण प्रयत्नशील असून प्रत्येक गावात संत नारायण महाराजांची मूर्ती स्थापना व्हावी आणि त्यांच्या विचारांचा संस्कार समाजमनावर व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. संतांच्या संगतीत राहिल्याने मानवाची उन्नती होते. सोहळ्याच्या सांगतेनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाच्या पंगतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी हत्राळ-सैदापूर गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, तरुण, महिला तसेच परिसरातील गुणवंत भजनी मंडळांचे सदस्य आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तजानापूर लिफ्टद्वारे ठाकूर पिंपळगाव येथील बंधारा भरण्याची आ.राजळेकडे मागणी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** पैठण जलाशयाची निर्मिती होताना शेवगाव तालुक्यातील असंख्य गावांना विस्थापित व्हावे लागले असून या जलाशयामध्ये प्रत्येक वर्षी पावसाळ्यात जे पाणी येत आहे. त्या पाण्यावर शेवगाव तालुक्याचा हक्क असल्याने व सध्या पावसाळ्याच्या चालू हंगामात जून, जुलै व ऑगस्ट असे ३ महिने उलटले असताना सुद्धा तालुक्यात अजूनही बऱ्यापैकी पाऊस न झाल्याने तालुक्यातील अनेक गावातील विहिरींनी तळ गाठले असल्याने खरीप पिकाबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला असल्याने पैठण येथील नाथसागर जलाशयातून असणाऱ्या ताजनापुर लिफ्टमधून ठाकूर पिंपळगाव गावातील बंधारा पाणी सोडून भरण्यात यावा अशी प्रमुख मागणी ठाकूर पिंपळगाव गावातील सर्वपक्षीय शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने आ. मोनिका राजळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली असल्याबाबतची माहिती सरपंच संजय खेडकर यांनी दिली आहे. पावसाळ्याच्या चालू हंगामात पावसाळ्याचा ३ महिन्याचा कालावधी उलटला असून सुद्धा पाऊस न पडल्याने कधी नव्हे एवढी भयाण परस्थिती निर्माण झाली असल्यामुळे शेतीच्या शिंचनाबरोबरच पिण्याच्या पाण्याचा व विशेषकरून पशुधनाचा मोठा प्रश्न गंभीर झाला आहे.

## शिक्षक विद्यार्थ्यांना यशाची वाट दाखवतात : प्रा. अशोक गांगड



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** शिक्षकाने केलेल्या छोट्याशया कौतुकाने देखील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनातील वेगळेच रसायन असते. श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन उत्सहात साजरा कारण्यात आला त्या प्रसंगी प्रा.अशोक गांगड बोलत होते. या कार्यक्रम प्रसंगी प्रथम विद्यालयात दहावीच्या एक दिवसीय विद्यार्थी शिक्षकांनी पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांना शिकवले तर बारावी च्या विद्यार्थी शिक्षकांनी अकरावी च्या विद्यार्थ्यांना शिकवले. या प्रसंगी विद्यार्थी शिक्षकांनी शिक्षकांचा भेटवस्तू व गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. ऋतुजा धरम, प्रियल झावरे, भाग्यश्री खोडदे प्रियंका पाटील, सुप्रिया चिकणे, तुषार खैरे, सिद्धी आंधळे, वेदिका वाळुंज या विद्यार्थ्यांनी प्रथम उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जीवनपट उलगडून सांगितला. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक,प्राध्यापक,शिक्षके त्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीत चिमुकल्यांनी साकारला कृष्णजन्माचा सोहळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**पाथर्डी शहर :** नंदाच्या अंगणी कृष्णाचा जन्म झाला अन् गोकुळाचा आनंद द्विगुणित झाला... अशाच भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणाची अनुभूती फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी सीबीएसई स्कूलमध्ये आली. गोकुळाष्टमीनिमित्त फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी प्री-प्रायमरी पाथर्डी व तिसगाव या दोन्ही युनिट्सच्या संयुक्त विद्यमाने दहीहंडी व श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तब्बल १७५ चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या विविध लीला आपल्या निरागस अभिनयातून, नृत्यातून आणि कलाविष्कारातून साकारत उपस्थितांची मने जिंकली.

गोकुळातील वातावरण जिवंत करणाऱ्या या सोहळ्यात चिमुकले विद्यार्थी राधा-कृष्ण तसेच श्रीकृष्णाच्या सवंगड्यांच्या आकर्षक व पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. रंगीबेरंगी वेशभूषा, निरागस हास्य आणि कृष्णभक्तीने भारलेला परिसर यामुळे शाळेत जणू छोटेखानी गोकुळच अवतरल्याचे चित्र निर्माण झाले होते.

श्रीकृष्णाच्या विविध लीलांवर आधारित नृत्य, रासलीला आणि सांस्कृतिक सादरीकरणांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. श्रीकृष्ण जन्म आणि त्यांच्या जीवनातील विविध प्रसंगांवर आधारित नाट्यप्रयोग हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. चिमुकल्या कलाकारांनी सादर केलेल्या निरागस अभिनयाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

यानंतर पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडण्यात आली. विद्यार्थ्यांचा उत्साह, टाळ्यांचा कडकडाट आणि 'गोविंदा'च्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. बालमनाला आनंद देतानाच भारतीय संस्कृती, परंपरा आणि श्रीकृष्णाच्या जीवनमूल्यांची ओळख करून देणारा हा सोहळा संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आरती जायभाय व शाळेच्या समन्वयक अनुराधा कोरी यांच्या हस्ते श्रीकृष्ण मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी प्री-प्रायमरी विभागाचे श्री. जयराम ढाकणे सर, तसेच संगीता उबाळे, अर्चना कोंगे, पूनम बाहेती, लता बिर्ला, अलमास शेख, पवन गिरी आणि रवी धायतडक यांच्यासह प्री-प्रायमरी विभागातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

चिमुकल्यांच्या सादरीकरणामागे शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिता भावसार व पूजा धारवाडकर यांनी केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि बालवयातच त्यांच्यामध्ये भारतीय संस्कृती व परंपरांविषयी संस्कार रुजावेत, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.

## मनोज काशीद जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** शिक्षक दिनानिमित्त जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा प्रवरानगर येथील डॉ. धनंजय गाडगीळ सभागृहात उत्साहात पार पडला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोसपुरी येथे कार्यरत असलेले शिक्षक मनोज काशीद यांना उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते काशीद यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, शालिनीताई विखे पाटील, राजेश परजणे, आमदार किशोर दराडे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुघे, शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. मनोज काशीद यांनी खोसपुरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत असताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे नाते तसेच पालक व ग्रामस्थांचा शाळेतील सहभाग वाढविण्यासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# शेवगावच्या ५ कोल्हापूर बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी ६ कोटींचा निधी मंजूर

## ७४८ हेक्टर क्षेत्राला मिळणार सिंचनाचा लाभ; आ. मोनिकाताई राजळे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील जलसाठे व सिंचन व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून ५ कोल्हापूर पद्धतीच्या (को. प.) बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी एकूण ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामांमुळे तब्बल ७४८ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

यामध्ये वडुले बुद्रुक येथील नंदिनी नदीवरील को. प. बंधारा दुरुस्तीसाठी १ कोटी मंजूर असून, १५० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

वाघोली येथील वृद्धा (येर्डा) नदीवरील को. प. बंधारा दुरुस्तीसाठी १ कोटी मंजूर असून, १३४ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे.

समानगाव येथील ढोरा नदीवरील को. प. बंधारा दुरुस्तीसाठी १ कोटी मंजूर असून, १८६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

ढोरजळगाव येथील ढोरा नदीवरील को. प. बंधारा दुरुस्तीसाठी १ कोटी ५० लाख मंजूर असून, ७२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे.

मळेगाव शे. येथील ढोरा नदीवरील को. प. बंधारा दुरुस्तीसाठी १ कोटी ५० लाख मंजूर असून, १०६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.



या निधीचा उपयोग कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीबरोबरच आवश्यक त्या ठिकाणी को. प. बंधाऱ्यांचे इलिप्टिकल बंधाऱ्यात रूपांतर करण्यासाठी करण्यात येणार आहे. त्यामुळे बंधाऱ्यांची जलसाठवण क्षमता व कार्यक्षमता वाढण्यास मदत होऊन परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होणार आहे.

या कामांसाठी निधी मंजूर करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे) ना. गिरीश महाजन तसेच जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ ) तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे आमदार मोनिकाताई राजळे यांनी आभार मानले.

शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध व्हावे आणि जलसाठे अधिक सक्षम व्हावेत, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. मंजूर निधीतून को. प. बंधाऱ्यांची दुरुस्ती व आवश्यक ठिकाणी त्यांचे इलिप्टिकल बंधाऱ्यात रूपांतर करण्यात येणार आहे. या कामांचा शेतकऱ्यांना निश्चितच मोठा फायदा होईल, असे आमदार मोनिकाताई राजळे यांनी सांगितले.

पंधरा दिवसांत निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना तातडीने सुरुवात करण्यात येणार असल्याचेही आमदार मोनिकाताई राजळे यांनी सांगितले.

या कामांमुळे शेवगाव तालुक्यातील जलसंधारण व सिंचन व्यवस्थेला बळकटी मिळणार असून, भविष्यात शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री
सोमवार दि.०७ सप्टेंबर २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# अखेर नॉर्दन ब्रँच कालव्याचा श्वास मोकळा

## वरिष्ठांकडून शेख यांचे कामगिरीचे कौतुक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : शहरातून जाणाऱ्या नॉर्दन ब्रँच कालव्यात सोडण्यात येणारे दुषित पाणी बंद करण्यास गेली २५ ते ३० वर्षांपासून कुणा अधिकाऱ्यांना मुहूर्त सापडत नव्हता . कॅनाल लगतच्या काही नागरिकांकडून सोडण्यात येणारे दुषित पाण्यावर निर्बंध घालने हे मोठे जिकीरीचे आव्हान नॉर्दन ब्रँच सिंचन शाखेचे शाखा अभियंता असद शेख यांनी स्विकारले.

कालवा नुतनीकरण , खोलीकरण मोहिमेअंतर्गत आपल्या कार्यकाळात टप्याटप्याने एका वर्षाच्या आत त्यांनी कालव्यात सोडण्यात येणारे दुषित सांडपाण्याचे स्त्रोत बंद करून कालवा चकाचक करून श्वास मोकळा केल्याने शहरवासीयांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही शेख यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले आहे. श्रीरामपूर शहरातील रेल्वेलाईनच्या (उत्तर)पलिकडून नागरी वस्तीतून हा एन बी कॅनॉल शिरसगाव,हरेगांवकडे जातो. अनेक वर्षापासुन लगतच्या रहिवाशांकडून या कालव्यात टॉयलेट , बाथरूमचे पाणी सोडण्यात येत होते. कॅनॉल रोटेशन बंद झाल्यानंतर स्थानिक रहिवाशांसह पादचाऱ्यांना दुषित पाण्याचे दुर्गंधीचा त्रास होत असे. कॅनॉल मधून व बाजुने पिण्याचे पाण्याचे पाईप असल्याने पिण्याचे पाण्यात हे दुषित पाणी जात असल्याच्या तक्रारी रहिवाशांनी नगरपालिका व पाटबंधारे कार्यालयाकडे केल्या होत्या.

जलसिंचन विभागाचे कालवा स्वच्छता व खोलीकरण मोहिमेअंतर्गत कार्यकारी अभियंता एस व्ही काळे, उपविभागीय अभियंता संजय कल्हापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली नॉर्दन ब्रँचचे शाखा अभियंता अशद शेख यांनी कामाची जबाबदारी स्वीकारली. या कामास त्यांनी एकदम सुरुवात न करता टप्प्याटप्याने सुरुवात करताना श्रीरामपूर नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी स्थानिक नगरसेवक यांचेही शेख यांना मोलाचे सहकार्य लाभले. शहरवासीयांना पिण्याचे पाणी पुरवठा नळ पाईप बाजूने काढून देण्यात आले. त्यामुळे दुषित पाण्याची शंका दुर होऊन स्वच्छ पाणी पुरवठ्याच्या दिलासा या भागातील नागरिकांना मिळाला. अनेक वर्षापासुन कालवा स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर होता. तो शेख यांनी जातीने काळजीपूर्वक चर्चेने लक्ष घालून, कालवा स्वच्छता मोहिमेअंतर्गत स्वच्छता व खोलीकरणाचे उत्कृष्ट काम पूर्ण केले.यामुळे साठणारे दुषित पाण्यामुळे नागरिकांची दुर्गंधी पासून मुक्तता झाली आहे.

कारण कालव्यात सोडण्यात येणारे टॉयलेट, बाथरूमचे पाणी स्वच्छता व खोलीकरणाने नागरिकांच्या सहकार्याने कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहे. कालवा चकाचक होऊन मोकळा श्वास घेऊ लागल्याने, शहर वासियासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही नॉर्दन ब्रँचचे शाखा अभियंता शेख यांचे कामांचे कौतुक केले आहे.

# तरुणावर टोळक्याकडून जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील लोणी खुर्द येथील ब्राह्मणे वस्ती परिसरात जुन्या वादातून एका तरुणावर चार ते पाच जणांच्या टोळक्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चाकू, रॉड व तलवारीने हल्ला करून गंभीर दुखापत केल्याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या हल्ल्यात नरेश शंकर लोट (वय ३८, रा. ब्राह्मणे वस्ती, लोणी खुर्द, ता. राहाता) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या प्रवरा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असल्याची माहिती आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ५ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ८.१० वाजण्याच्या सुमारास ब्राह्मणे वस्ती परिसरात ही घटना घडली. फिर्यादी नरेश लोट हे घरी जात असताना चार ते पाच इसमांनी एकत्र येऊन त्यांना अडविले. कोणतेही ठोस कारण नसताना आरोपींनी शिवीगाळ व मारहाण करत चाकू, रॉड आणि तलवारीसारख्या धारदार शस्त्रांनी हल्ला केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हल्लेखोरांनी नरेश लोट यांच्या हातावर, पाठीवर व डोक्यावर वार करून गंभीर दुखापत केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात काही आरोपींची नावे समोर आली असून, इतर आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या. लोणी पोलीस ठाण्याचे अधिकारी पुढील तपास करीत आहेत.

### रॉड-तलवारींचा वापर

*या हल्ल्यात एकाचवेळी चार ते पाच जणांनी सहभाग घेतल्याचा आरोप असल्याने ब्राह्मणे वस्ती परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.*

## राष्ट्र सह्याद्री इम्पॅक्ट

# उपसरपंच कुरकुटेंच्या पुढाकाराने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**घारगाव** : कुरकुटवाडीच्या आदिवासी बांधवांच्या चार दिवसांपासूनच्या पाण्याचा आणि रस्त्याचा प्रश्न 'राष्ट्र सह्याद्री'ने लावून धरताच प्रशासकीय यंत्रणा व स्थानिक लोकप्रतिनिधी हरकत न घेता तात्काळ कामाला लागले आहेत. बातमी प्रसिद्ध होताच उपसरपंच बाळासाहेब कुरकुटे यांनी स्वतः पुढाकार घेत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला आहे. 'राष्ट्र सह्याद्री'शी बोलताना उपसरपंच बाळासाहेब कुरकुटे यांनी सांगितले की, यापूर्वीही त्यांनी स्वतःच्या स्वखर्चाने बोरवेल मारून देऊन नागरिकांना पाणी उपलब्ध करून दिले होते. मात्र, कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना राबवण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या नावावर १ गुंठा जागा करून देणे कायदेशीररीत्या आवश्यक आहे. ही जागा अद्याप हस्तांतरित न झाल्यामुळे पुढील ठोस योजना अंमलात आणण्यास अडचणी येत होत्या. दरम्यान, शाळेचा रस्ता व पांदण रस्त्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी गेल्या २ वर्षांपासून मंडळ अधिकारी (सर्कल) व तहसीलदार यांच्याकडे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. 'राष्ट्र सह्याद्री'च्या बातमीमुळे या सर्व समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, आता संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी (तहसीलदार व सर्कल) याची गांभीर्याने दखल घेऊन रस्त्याचा आणि कायमस्वरूपी योजनेचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

# समृद्धी महामार्गावर अज्ञात वाहनाची धडक

## वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**वैजापूर** : समृद्धी महामार्गावरील खंबाळा शिवारात रविवारी सायंकाळी भरधाव अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत ६० वर्षीय वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला. कौशाबाई जगन गांगुर्डे (रा. खंबाळा-भागगाव, ता. वैजापूर) असे मृत महिलेचे नाव आहे. अपघाताची भीषणता एवढी होती की त्यांच्या शरीराचे दोन भाग झाले. कौशाबाई या बकऱ्यांचे पालन करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होत्या. रविवारी त्या बकऱ्या चारण्यासाठी महामार्गालगत गेल्या होत्या. बकऱ्यांना सुरक्षित ठिकाणी नेण्याचा प्रयत्न करीत असताना भरधाव आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळी न थांबता वाहनासह पसार झाला. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून अज्ञात वाहनाचा शोध सुरू केला आहे. मृतदेह वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला. या घटनेने खंबाळा-भागगाव परिसरात शोककळा पसरली असून, अज्ञात वाहनचालकाचा तातडीने शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# नोकरीचे आमिष दाखवून लुटारूला पोलिसांनी जाळ्यात ओढले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : समृद्धी महामार्गावरील वाहनचालकांना लुटणाऱ्या टोळीविरोधात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत फरार चार आरोपींना अटक केली. यातील एका आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांनी रस्ते बांधकाम कंपनीचे ठेकेदार असल्याचे भासवत नोकरीचे आमिष दाखवून सापळ्यात ओढले. वैजापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत हडसपिंपळगावजवळ २६ ऑगस्ट रोजी राहुरी येथील वाहनचालकाला अडवून लुटण्यात आले होते. या प्रकरणात यापूर्वी सात आरोपींना अटक झाली होती.

मात्र, ओमकार रामचंद्र फसले (२२, रा. म्हाळस जवळा, जि. बीड) याच्यासह चार आरोपी फरार होते. ओमकार गावातच लपल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी वेषांतर करून म्हाळस जवळा येथे सापळा रचला. पोलिसांनी रस्ते बांधकामासाठी टिपर चालकाची गरज असल्याचे सांगत चांगला पगार देण्याचे आमिष दाखवले. पानटपरी चालकामार्फत ओमकारच्या मित्राशी संपर्क साधून ही माहिती त्याच्यापर्यंत पोहोचविण्यात आली.

नोकरीच्या आशेने तो पानटपरीवर येताच साध्या वेशातील पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. दरम्यान, दुसऱ्या पथकाने कायगाव टोका परिसरातून भीमराव उर्फ शहादेव भगवान तांदळे (२६, पाथर्डी) आणि सुनील गणपत चव्हाण (२२, गेवराई) यांना अटक केली. चौथा आरोपी सुनील कल्याण शेंडगे (२६, अंबड; सध्या रांजणगाव शेणपुंजी) याला तिसगाव परिसरातून पकडण्यात आले. लुटीसाठी वाहन उपलब्ध करून देण्यात त्याचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# नोकरीचे आमिष अन् धर्मांतराचा दबाव !

## आर्थिक व्यवहारांसह 'मोठ्या चेहऱ्यां'चे कनेक्शन तपासण्याचे आव्हान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : कायमस्वरूपी नोकरीचे आमिष दाखवून शिक्षकांना आपल्या जाळ्यात ओढल्यानंतर त्यांच्यावर कथितपणे धर्मांतरासाठी दबाव आणल्याच्या आरोपामुळे वैजापूर तालुक्यात खळबळ उडाली आहे. माळीघोगरगाव येथे समोर आलेल्या या प्रकरणात पालकांनंतर त्यांच्या मुलांवरही धर्मांतरासाठी दबाव आणल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वीरगाव पोलिसांनी तपासाला वेग दिला असून रविवारी पोलिस पथकाने संबंधित चर्चसह घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. तक्रारीनुसार, प्राथमिक शाळेतील शिक्षक बालासाहेब अप्पासाहेब साठे आणि त्यांच्या पत्नी पूजा यांना २०२४ मध्ये शिक्षक म्हणून कामावर घेण्यात आले होते. कायमस्वरूपी नोकरी मिळेल, या आशेने त्यांनी संबंधित व्यक्तींशी संपर्क साधला होता. मात्र, पुढे नोकरीच्या आश्वासनाचा संबंध कथित धर्मांतराच्या दबावाशी जोडला गेल्याचा आरोप करण्यात आला आहे.




या प्रकरणातील आरोपी म्हणून फादर आशीष म्हस्के, सुदाम उबाळे, फादर जेरॉल्ड रिहेलो, संजय रूपेकर आणि विनोद शेलके यांची नावे तक्रारीत नमूद करण्यात आली आहेत. संबंधितांनी संगनमत करून पाच लाख रुपये घेतल्याचा आणि त्यानंतर धर्मांतरासाठी वारंवार दबाव आणल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. धर्मांतरास नकार दिल्यानंतर जातीय स्वरूपाचा त्रास देऊन नोकरीतून काढून टाकल्याचाही दावा पीडितांनी केला आहे. दरम्यान, पीडितांना माळीघोगरगाव येथील चर्चमध्ये नेऊन धार्मिक विधी करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून तेथील परिस्थिती, संबंधित व्यक्तींच्या भूमिका आणि कथित धार्मिक विधींशी संबंधित पुराव्यांचा तपास सुरू केला आहे.

त्याचबरोबर नोकरीची नियुक्ती प्रक्रिया, पैशांची देवाणघेवाण आणि पीडितांवर कथितपणे टाकण्यात आलेला दबाव याबाबतही माहिती संकलित केली जात आहे. या प्रकरणातील आणखी एक गंभीर आरोप म्हणजे पालकांनंतर त्यांच्या मुलांवरही धर्मांतरासाठी दबाव आणण्यात आल्याचा दावा. त्यामुळे कुटुंबातील इतर सदस्यांवरही अशाच प्रकारे दबाव आणण्यात आला होता का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, सूत्रांच्या माहितीनुसार वैजापूर परिसरात अशा प्रकारच्या तीन शाळा सुरू असल्याचा दावा केला जात आहे.

तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अशा प्रकारच्या एक डझनहून अधिक संस्था सक्रिय असल्याची माहितीही सूत्रांकडून दिली जात आहे. मात्र, या दाव्यांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

### 'मोठ्या चेहऱ्यां'चे कनेक्शन तपासण्याचे आव्हान

माळीघोगरगाव प्रकरणातील तक्रारींची सत्यता तपासताना या कथित प्रकारामागे आणखी कोण व्यक्ती किंवा संस्था कार्यरत आहेत का, याचा शोध घेणे पोलिसांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. पैशांचे व्यवहार, शाळेतील नियुक्त्या, धार्मिक विधी आणि नोकरीवरून कमी करण्याची कारणे यांची साखळी तपासण्यात येणार आहे. सध्या तक्रारीतील आरोपांची सत्यता तपासातूनच स्पष्ट होणार असून, त्यानंतरच या प्रकरणाचे नेमके स्वरूप आणि व्याप्ती समोर येण्याची शक्यता आहे.

# कबड्डी व दहीहंडी स्पर्धेत त्रिमूर्तीच्या संघाने बाजी मारली



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील टोका प्रवरासंगम येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने जय मल्हार मित्र मंडळाच्या आयोजित केलेल्या कबड्डी व दहीहंडी स्पर्धेत मेजर साहेबराव घाडगे पाटील यांनी स्थापित केलेल्या त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील त्रिमूर्ती कबड्डी अकॅडमीच्या संघाने दोन्ही स्पर्धेत बाजी मारत विजेतेपद पटकावले. प्रवरासंगम येथील श्री सिद्धेश्वर हायस्कूलच्या प्रांगणात माजी मंत्री शंकरराव गडाख मित्र मंडळाच्या खंबीर साथीने व युवा नेते उदयन दादा गडाख पाटील यांच्या प्रेरणेने सदरच्या कबड्डी स्पर्धा व दहीहंडी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी स्पर्धेप्रसंगी भेट देत खेळाडूंना मार्गदर्शन करत त्यांचा उत्साह वाढवला. या स्पर्धेत मच्छिंद्रनाथ सेवाभावी फाउंडेशनचे अध्यक्ष व नाथभक्त दिलीपराव वाघ पाटील, नेवासा तालुक्याचे युवा नेते उदयनदादा गडाख,पुणे येथील अजय कुलकर्णी,माजी सरपंच सुनीलराव बाकलीवाल यांनी विशेष योगदान बक्षीसांच्या माध्यमातून दिले होते. झालेल्या कबड्डी स्पर्धेत त्रिमूर्ती कबड्डी अकॅडमी च्या संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले या स्पर्धेनंतर टोका येथील खंडोबा मंदिर प्रांगणात झालेल्या दहीहंडी स्पर्धेत देखील त्रिमूर्ती च्या संघाने बाजी मारत दहीहंडी फोडून विजेतेपद पटकावले. विजेत्या संघास नाथभक्त दिलीप महाराज वाघ पाटील यांच्या हस्ते पारितोषिकांचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील कबड्डी खेळाडूंना वाव मिळावा म्हणून स्पर्धेचे आयोजक शांतवन खंडागळे व जय मल्हार मित्र मंडळाचे मार्गदर्शक पत्रकार सुधीर चव्हाण यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा सुमतीताई घाडगे, उपाध्यक्षा स्नेहलताई घाडगे, प्रा. सोपानराव काळे, कबड्डी प्रशिक्षक गणेश शिंदे, मुळा कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब पाटील, स्पर्धेचे आयोजक शांतवन खंडागळे, पत्रकार सुधीर चव्हाण, माजी सरपंच सुनील बाकलीवाल, परवेझ पठाण यांनी विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले आहे.

# प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्वांच्या योगदानाची अपेक्षा : ना. राधाकृष्ण विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : श्रीक्षेत्र निझर्णेश्वर देवस्थानाच्या रुपांतर आता अध्यात्मिक आणि धार्मिक पर्यटन स्थळामध्ये होत आहे.सुमारे चार कोटी रुपयांच्या निधीतून पूर्ण होत असलेला प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्वाच्या योगदानाची अपेक्षा जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केली. श्रावण महीन्याच्या निमिताने मंत्री राधाकृष्ण विखे यांनी श्रीक्षेत्र निझर्णेश्वराला अभिषेक करून दर्शन घेतले. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ शालिनी विखे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे रणरागिणी महीला मंडळाच्या अध्यक्षा धनश्री विखे आणि कुटुंबिय उपस्थित होते. आ. अमोल खताळ शिवाजीराव जोंधळे मच्छिंद्र थेटे कैलास तांबे भगवानराव इलग यांच्यासह मंदिर विश्वस्त समितीचे सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.



विश्वस्त आणि ग्रामस्थांनी मंत्री विखे पाटील यांचा सत्कार केला. श्रीनिझर्णेश्वर येथे असलेल्या श्रध्देपोटी दरवर्षी आपण श्रावण पर्वात येत असतो. खासदार साहेबांनी सुध्दा एकही वर्ष चुकवले नाही.सर्व राजकीय निवडणुकांची सुरूवात सुध्दा या पवित्र स्थानावरून आपण करतो. त्यामुळेच या तिर्थस्थानाबद्दल असलेली श्रध्दा खूप वेगळी असल्याचे त्यांनी सांगितले.

निझर्णेश्वर परिसराचा विकास अध्यात्मिक आणि निसर्ग पर्यटनातून होत असून या ऐतिहसिक आणि पौराणिक मंदिराचा विकास होत आहे.सुमारे चार कोटी रुपयांच्या निधीतून मंदिर आणि परिसराचा कायापलाट होणार आहे.अधिकचा निधी लागला तरी उपलब्ध करून देण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली. परिसरात वन विभागाच्या माध्यमातून बिबट सफारीचा प्रकल्प कार्यान्वित होत आहे.दूधेश्वर डोंगराच्या परिसरात सुध्दा कार्यान्वित होणारा प्रकल्प पर्यटनाचे मुख्य केंद्र बनेल.मंदिर परिसराचा पाणी प्रश्न सौडविण्यासाठी काय उपाय योजना करता येईल यासाठी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी सर्व्हे करण्याच्या सूचना दिल्या. आपल्या भागात पावसाची प्रतिक्षा अजून आहे.त्यामुळे अधिकचा पाऊस पडू दे आशी प्रार्थना श्री निझर्णेश्वराच्या चरणी केली असल्याचे त्यांनी सांगितले. आ.अमोल खताळ यांनी आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून तालुक्यातील महत्वाच्या प्रश्नांची झालेली सोडवणुक होत आहे.

निझर्णेश्वर तिर्थस्थानाच्या विकासला गती मिळाली. परंतू ,भोजापूर प्रकल्पाचा समावेश वैतरणा दमणगंगा गोदावरी नदीजोड प्रकल्पात करून दुष्काळी भागातील गावांना न्याय दिला असल्याचे त्यांनी सांगितले.मंदिराच्या जीर्णो द्धारासाठी देणगी देण्यार्या व्यक्तिंचा सन्मान मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

# नागलवाडी शिवारात चोरटी वाळू वाहतूक करणारा ताब्यात

## टेम्पोसह ८ लाखाचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात मिरजगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागलवाडी शिवारात सीना नदी पात्रात चोरटी वाळूची वाहतूक करणाऱ्या एकाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने रंगेहात पकडले. महेंद्र सदाशिव दादर ( रा. नागलवाडी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) असे ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून टाटा कंपनीचा टेम्पो व वाळू असा सुमारे ८ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, जिल्हा पोलीस प्रमुख मुमक्का सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाला जिल्ह्यात विविध ठिकाणी अवैध वाळू वाहतूक होत असल्याबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार श्यामसुंदर जाधव, भाऊसाहेब काळे, रोहित मिसाळ यांचे पथक तयार करून कर्जत तालुक्यातील मिरजगाव परिसरात अवैध वाळू वाहतुकीबाबत माहिती घेत असताना त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती समजली की, मिरजगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागलवाडी शिवारात सीना नदी पात्रात एका टेम्पो मधून वाळू वाहतूक सुरू आहे.

या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता पोलिसांना त्या ठिकाणी टाटा कंपनीच्या एका टेम्पो मधून वाळूची वाहतूक करताना महेंद्र सदाशिव दादर (रा. नागलवाडी, ता. कर्जत) हा इसम आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असता त्याच्याकडे वाळू वाहतुकीच्या परवाना विषयी विचारणा केली असता त्याच्याकडे तसा कुठलाही परवाना नसल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी महिंद्र दादर याला ताब्यात घेतले असून त्याच्या ताब्यातील टाटा कंपनीच्या टेम्पो व वाळू अशा सुमारे ८ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. महेंद्र दादर याच्याविरुद्ध मिरजगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मिरजगाव पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहे.